# श्री साईलीला



स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर,** टे. नं.
जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ ३५५७२१



# श्री साई वाक्सुधा

द्वारकामाई म्हणा वा मशीदमाई म्हणा ! पुण्यपावन असें तें आश्रय-स्थान आहे. तो आश्रय ज्यानें मिळविला, तेथें ज्याचें मन रमलें त्यानें या जगांत चिंता करण्यासारखें असें कांहीं नाहीं. ती आपली आई आहे. आणि आई ही मायाळूच असते. ती आपल्या लेकरांच्या कल्याणासाठीं, त्यांचें भलें व्हावें म्हणून नेहमीं झटणारच. आपली त्या स्थानावर श्रद्धा मात्र पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] ऑक्टोबर १९६६ [ अंक ७ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

नाम–जपाचें सामर्थ्य अपरंपार आहे. नाममहिमा व नामजपापासून होणारा फायदा शब्दांनीं वर्णन करून सांगतां येण्यासारखा नाहीं. ज्याचा अनुभ त्याला.

परंतु नामजपापासून कसला फायदा होत नाहीं किंवा झाला नाहीं असें म्हणणारे हरीचे लाल पुष्कळ सांपडतील. फायदा होण्यासाठीं तसें वर्तन आपल्याकडून घडलें पाहिजे. हें एक प्रकारचें व्रतपालन आहे.

आम्हीं सत्पुरुषांची निंदानालस्ती करीत रहाणार. आमच्या अंतःकरणांत श्रद्धेच्या नांवानें भोपळ्याएवढें पूज्य! परनिंदा ही नेहमीं करायची व ती कानांनीं ऐकण्यांत गोडी वाटायची! स्वतःची तुंबडी भरण्यासाठीं दुसऱ्यांची फसवणूक कशा रीतीनें करावी हे विचार त्या मनांत सतत घोळत असावयाचे! साऱ्या देवदेवता एकच आहेत. त्यांच्यांत भेदभाव नाहीं या विचाराऐवजीं मनांत द्वैतभाव सतत जागा असावयाचा. प्राणिमात्रावर दया करण्याऐवजीं त्यांच्याशीं निर्दयतेनें वागण्याकडे मनाची प्रवृत्ति! अशा एक ना दोन किती गोष्टी सांगाव्या?

माणसाला जडलेले हे सर्वसाधारण दुर्गुण आहेत. शेंकडा ९० ते ९५ माणसें या व अशा प्रकारच्या दुर्गुणांनीं पछाडलेलीं आढळून येतील. तेथें भगवंताला व भगवन्नामाला वास्तव्य करायला जागा आहे कुठें?

वरपांगीं दिसायला सारें सोज्वळ; परंतु अंतरीं असती नाना कळा। त्या समजणार कोणाला? एकट्या भगवंताला! आणि मग त्यानें तुमच्या वाऱ्याला कां म्हणून उभें रहावें?

तुमचें मन पवित्र बनलें पाहिजे. कोणत्याहि प्रकारच्या दुष्ट विचारांना तेथें स्थान असतां कामा नये. आंत–बाहेर निर्मळ, मंगल व पवित्र. आणि अशा अवस्थेंत श्रद्धायुक्त अंतःकरणानें तुम्ही नामजप करूं लागलां, तर तुमचें अंतःकरण अधिकाधिक पवित्र बनत जाईल; मग अपवित्राचा विटाळ तुम्हांला होऊं शकणार नाहीं.

× × ×

देवळांत देवदर्शनाला जायचें; रोजच्या रोज जायचें; हा क्रम वर्षानुवर्षें चालू रहावयाचा. देवळांत जाऊन दर्शन घेतां, ठीक आहे; नमस्कार करतां फार उत्तम; परंतु अंतःकरणांत त्यावेळीं कोणती कालवाकालव चालली आहे, नमस्कार कां व

कोणत्या अवस्थेंत केला जात आहे हें इतरेजनांस नाहीं समजूं शकलें तरी देवाला समजूं शकतें.

देवाला केलेला नमस्कार किंवा क्षणभर शांत चित्तानें केलेलें त्याचें ध्यान. खरोखर श्रद्धायुक्त अंतःकरणानें केलेलें असेल तर त्या नमस्कारापासून तुम्हांला लाभ झाल्याशिवाय रहाणार नाहीं; परंतु 'देखल्या देवा दंडवत।' यांत कांहीं अर्थ नाहीं.

जें कांहीं कराल तें शुद्ध भावानें व निर्मळ अंतःकरणानें करा. मग 'भाव तेथें देव' याची प्रचीति तुम्हांला आल्याशिवाय राहाणार नाहीं.

बाबांनीं सर्वांना संदेश देऊन ठेविलाच आहे कीं, 'हरिभजन स्मरणाची घडी। पाप ताप दैन्य दवडी। ध्यानासी आणितां बहु आवडी। संकटीं उडी घाली तो॥'

त्याचें ध्यान करायचें, त्याचें नांव घ्यावयाचें तें परम आवडीनें घेतलें पाहिजे. ती वरकरणी भक्ति नको. तिचा कांहीं फायदा नाहीं. भक्ति करायची ती मनापासून. दुसऱ्यांना दाखविण्यासाठीं नव्हे तर स्वतःच्या शाश्वत कल्याणासाठीं.

आपलें कल्याण साधण्यासाठीं दुसरा कोणी उपयोगी पडणार नाहीं. तें आपलें आपण योग्य मार्गानें जाऊन साधायचें आहे. त्यासाठीं आपण बाबांच्या कृपेची याचना करावयाची. कारण 'मोठी कृपाळू ही मशीदमाई। भोळ्या भाविकांची ही आई। कोणी कसाही पडो अपायीं। करील ती ठायींच रक्षण॥

—सम्पादक

---


लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई २.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.




**माझे कांहीं अनुभव**

सौ. निर्मला एस. माडगांवकर, हिल रोड, बांद्रा—कळवितात कीं,

मी एकदां बाबांच्या देवळांत गेलें होतें. त्याच सुमारास आमच्या घरांत नोकर-- माणसांची अडचण होती. कुणीहि नोकर कामासाठीं नीट ठरविला नव्हता. माझीं लहान मुलें ,माझी अशक्त प्रकृति व घरकाम पाहून मी बाबांच्या पायांवर डोकें घासलें व म्हणालें, 'देवा, तुम्ही माझ्याबरोबर एकसारखे रहा.' नंतर थोडा वेळ तेथें मी बसलें व घरीं जाण्यासाठीं विचार करूं लागलें. पण एवढ्यांत तिथला पुजारी म्हणूं लागला, 'ताई, ताई जरा बसा.' नंतर मीहि पांच मिनिटं बसले. थोड्या वेळानें पुजाऱ्यानें बाबांच्या पुस्तकांतील एक चांगला बाबांचा फोटो मला दिला. मी बाबांच्या पायांवर मागितलं होतं ते माझ्या मनांत बोलून मागितलं होतं. मी बोललेलं मी देखील ऐकूं शकलें नव्हतें. तर मग पुजाऱ्याची गोष्टच दूर आहे. यावरून मी खात्रीनें सांगते कीं, बाबा माझ्याबरोबर 'फोटोच्या रुपांत' कां होईना येऊन भक्ताबरोबर एकसारखे रहातात हें पटविलें.

मी साईबाबांची एक नवीन भक्त आहे. मी यापूर्वी देवाची विशेष भक्ति करीत नसे. आतांहि फार दिसेल असें देव देव करीत नाहीं.

मला आतांशा साईचं नामस्मरण करण्याचं व त्यांच्या कधींहि न विसरेन अशा आरत्या म्हणण्याचं वेडच लागलं आहे. त्यांचं नामस्मरण करतांच, मी सर्व दुःख विसरते, माझी शरीरव्यथा विसरते. मला कुणाची आठवण येत असल्यास त्यांना मी विसरूं शकते व बाबांच्या धीरामध्यें राहूं शकते. मला साईबाबांचं नांव अगर त्यांची आरती म्हणजे 'आईच' भासते. मला आई म्हणजे कांहींच कल्पना करतां येत नाहीं. कारण मला आई नाहीं. यावरूनच त्यांच्या नांवांत किती सामर्थ्य असेल याची कल्पना करावी. खालीं मी एक लहानसा अनुभव देते. बाबांचा धीर म्हणजे किती आहे तो पहा.

मला साईबाबांच्या भक्तीबद्दल कांहीं थोड्या वर्षांपासूनच ओढ होती. परंतु आतां माझी त्यांच्याबद्दलची भक्ति दिवसेंदिवस वाढूं लागली आहे. मी एक लहानसा अनुभव लिहून पाठवत आहे.

आमच्या मुलीला एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत घालण्याचें ठरत होतें. त्याकरितां सर्वांनीं दोन महिने आधींपासून ॲडमिशन मिळण्याकरितां खूप प्रयत्न केले. नंतर शाळा उघडण्याचे सुमारास परत शाळेंत जाऊन जागेबद्दल विचारलें. परंतु शाळेच्या नियमानुसार सर्व बाजूंनीं प्रवेश मिळण्यास अडचण पडूं लागली व आम्हांला रोज जवळ जवळ आठ दिवस निराशा वाटूं लागली. अशा तऱ्हेनें आम्हांला प्रयत्नांत कांहींच यश मिळेना. तेव्हां शेवटीं मी ठरविलं कीं, कांहींहि होवो आज बाबांची उदी लावून मुलीच्या वडिलांना शाळेंत काय होतें तें पाहण्यास पाठवून द्यावें.

संध्याकाळीं आम्हांला हवें असलेलेंच शाळेंतून उत्तर मिळालें. काय योगायोग पहा. रोज जवळ जवळ दहा दिवस व अगोदर कांहीं महिने आधींपासून खटपट करावी, परंतु आशेची खात्री नाहीं. आणि बाबांचाच अंगारा लावून आशेनें जावें व यश मिळावं. बाबांची केवढी कृपा ही. ही एक लहानशीच गोष्ट, परंतु साईबाबांवर विश्वास व माझी भक्ति वाढूं लागली आहे. आपल्याला अनेक शाळांतून ॲडमिशन शकते, नाहीं असें नाहीं, परंतु मनासारखे बाबांनीं घडवून आणलेंच.

आणखी एक छोटासाच अनुभव मी देतें.

( २ ) दुपारचे तीनचे सुमारास माझ्या घरांत मी व माझीं दोन लहान मुलं होतों. माझ्या चार वर्षांच्या मुलीला कां कोण जाणे अशी बुद्धी झाली कीं, आपण बाहेर न्हाणीघरांत जावं व आईला खोलीत कोंडून ठेवावं. तिनं तसं केलं. ती नंतर न्हाणींतून मोठमोठ्यानें ओरडूं लागली. मला कांहींच कळेना कीं, ही कां ओरडत आहे. मी सारखें ओरडून तिला सांगत होते कीं, तूं दाराची कडी काढ. ती ओरडे, व नंतर मी दाराची कडी काढ असें सांगें: असा कार्यक्रम दहा मिनिटें झाला. मला तिच्याबद्दल कळायला कांहींच मार्ग नव्हता. कारण कुणालाहि आंत येतां येण्यासारखें नव्हतें. व दुसरें म्हणजे माझ्याजवळ गोदरेजची चावीहि नव्हती. इतकें झाल्यावर मुलीचा आवाजच येण्याचें बंद झालें. आतां मी लिहीत आहे, तरी पण या आधीचें वाक्य लिहितेवेळीची स्थिति म्हणजे मला तोच प्रसंग दिसतो आहे. समोरच भिंतीवर साईबाबांचा फोटो आहे म्हणून धीर तरी वाटतो. असो. यावरून माझ्या घाबरून जाण्याची कल्पना येईल. अशावेळीं मला बाबांशिवाय कुणाचा धीर असणार? त्यांनीं माझ्या मनांत असा विचार पेरला कीं, 'तूं बिलकूल घाबरूं नकोस. कांहींहि झालं नाहीं' या एवढ्या वाक्यावर माझा श्वासोच्छ्वास तरी व्यवस्थित चालू होता. परंतु कांहीं झालें तरी मला थोडी तरी खटपट करायलाच हवी. मी बाहेरून लोक जमवून दार फोडून घेतलें व मोठ्या भीतीनेंच न्हाणीघरांत जाऊन पाहिलें. तर खरोखरच 'कांहींहि झालं नव्हतं' तिला परसाकडे झाल्यामुळं ती जागची हालूं शकत नव्हती. बस एवढंच. एकंदरींत मुलीला कांहींहि झालं नव्हतं.

हा प्रसंग झाला तेव्हां मी बाबांची फार भक्ति करीत नव्हतें. यावरून असें वाटते कीं, त्यांची भक्ति मनापासून केली तर ते सदैव आपल्या पाठी उभे असतील.

( ३ ) वर प्रसंग दिला आहे तसाच कांहींसा हाहि आहे. परंतु हा अनुभव दोन महिन्यामागचा आहे.

संध्याकाळीं सातचे सुमारास माझीं मुलं ह्यांच्याबरोबर फिरावयास जाण्याचा हट्ट करूं लागलीं. तेव्हां सर्वजण दादरच्या समुद्रावर फिरण्यासाठीं म्हणून गेले. सर्वजण घरीं परत तासाभरांत येतील म्हणून मला वाटत होतें, परंतु आठ वाजले, नंतर नऊ वाजले तरीहि ही मंडळी परत आली नाहींत. मला काळजी वाटूं लागली. मी सारखी साईबाबांची आठवण करूं लागले. लगेच देवाच्या मदतीनें धीर वाटूं लागला व लगेच कांहींच झालं नसणार व येतील परत असें गृहीत धरून मी वाट पाहूं लागले. शेवटीं अर्ध्या तासासाठीं गेलेली मंडळी तीन तासानें म्हणजे दहा वाजतां परत आली. अशावेळीं खरें म्हणजे घाबरण्यासारखें कांहीं नाहीं. परंतु बाबांनीं अगोदरच थोडी मनांत कल्पना आणवून दिली होती याबद्दल मला खात्री वाटते. एकदां मनुष्य बाहेर पडल्यावर तो जाऊन कधीं येईल याचा नेम नसतो.

आणि खरोखरच माझ्या भीतिप्रमाणें माझी कल्पना खरी ठरली. ह्यांच्या मोटरला थोडासाच अपघात झाला होता. रस्त्यावरील एका गरीब बाईला थोडेंसेंच लागलें होतें. परंतु मोटरमधील कुणालाच अगर मोटरलाहि धक्का बसला नव्हता.

यावरून असं वाटतं कीं, बाबा भक्तांना धोक्याची पूर्व सूचना देतात व संकटवेळीं धीर देतात.

× × ×

**संकट पार करणारे बाबा—**

श्री. परशराम जनार्दन चिखलीकर अंबा पेठ, उमरावती हे कळवितात—

उमरावती येथें श्री. तारानाथजी सबनीस हे एक निस्सीम श्री साईगजानन उपासक म्हणून आज पंधरा वर्षांपासून प्रसिद्ध आहेत. समाज शिक्षणाच्या एका मोठ्या मोटर व्हॅनच्या अपघातांतून त्यांना जीवदान मिळालें. त्यानंतर त्यांचा कल ईश्वरी संकेताप्रमाणे श्रीसाईगजाननाच्या भक्तींत लागला. गरीबीची हालत, आधुनिक वाढती महागाई असून देखील मुलाबाळांचा संसार सांभाळून नामस्मरणाचें महत्त्व त्यांनीं जाणलें व या अवधींत श्री बाबांच्या कृपाप्रसादें त्यांना बऱ्याच अंशीं अधिकारप्राप्तीचें सौख्य लाभलेलें आहे. त्यामुळें इकडील भागांत सर्व भक्तांच्या अंतःकरणांत ही व्यक्ती अत्यंत आदरणीय अशी मानण्यांत येत आहे. त्यांच्याच प्रेरणेनें श्रीसाई गजाननांनी सर्व मानव जातीला श्रद्धा व सबुरीच्या दिलेल्या महामंत्राच्या आदेशानी माझे मनावर विलक्षण असा परिणाम झाला. बाबांचे ठायीं अंतःकरणपूर्वक भाव उत्पन्न झाला व आज १०–१२ वर्षांपासून नित्यनियमांनीं

श्रीसाईगजाननाची अल्पशी सेवा करण्याचें महत्‌भाग्य मिळत आहे. त्यामुळें श्रीसाई-गजाननांचें हजारों तऱ्हेनें संसारांत मार्गदर्शन होत असून संकटकाळीं दृष्टांताच्या रूपानें आमचा वारंवार किंबहुना नित्य ते सांभाळ करतात, हा नित्याचा अनुभव आहे. विलक्षण असे हजारों अनुभव संग्रहीं आहेत. पैकीं श्रद्धेचा व सबुरीचा अगदीं ताजा असा अनुभव भक्तगणास कळावा म्हणून पाठवीत आहे.

नित्यनियमानुसार रोजच्या भक्तिभावानें होत असलेल्या संस्कारामुळें, मधून मधून वारंवार बाबांच्या दृष्टांतांनीं मार्गदर्शन घडत आहे व केवळ त्याच हिंमतीवर आमची संसारनौका पार पडत आहे. यंदा माझा मुलगा इंटरच्या परीक्षेस बसला होता. त्याच्या परीक्षेच्या निकालाचा आठवडा उगवला. तत्पूर्वी नागपूर युनिव्हर्सीटीच्या अधिकाऱ्यांना जबाबी पत्रांनीं निकाल कळवावा म्हणून पत्र धाडलें होतें. त्याच आठवड्यांत त्याचे निकालाचे कुतूहल मनांत घोळत असतां एके दिवशीं सकाळीं प्रत्यक्ष श्री. बाबांचे स्वरूपांत हातवारे करून प्रेमळ आवाजांत सांगण्यांत आलें कीं, “ अरे तुझा बंडू पास झाला आहे, पास झाला आहे रे ! ” व्यक्ती गुप्त झाली. घरांत सर्व लहान थोरांस हे सांगण्यांत आलें. दुसरे दिवशीं रजिस्ट्रारचें पत्र आलें कीं, बंडू नापास झाला आहे. सदरहूप्रमाणें झालेला दृष्टांत व आलेलें पत्र असे दोन्हीही श्री बाबांचे चरणीं अर्पण करून घरांत सर्वांना धीर दिला. असं होऊं तर नये. परंतु झालें. बाबांची इच्छा. चवथे दिवशीं सदरहु परीक्षेचा निकाल येथील लोकल वर्तमानपत्रांत जाहीर झाला. वर्तमानपत्र पाहण्यास मन धजेना. इतक्यांत चि. बंडूचा एक मित्र धांवत धांवत आला व बंडूचे अभिनंदन करूं लागला. रजिस्ट्रारचे खास पत्रानीं घरांत उत्पन्न झालेली विषण्णता विश्वास ठेवूं देईना. शेवटीं प्रत्यक्ष वर्तमानपत्र आणून पाहिल्यावर श्री बाबांच्या दृष्टांताची साक्षी सर्वांना पटली. वैयक्तिक माझा विश्वास अढळ होताच. बाबांची किमया कांहीं और असते. त्याला अंत नाहीं. यांतील मर्मितार्थ व श्रीसाईगजानन हे भक्तांना असेच खेळवितात, असेच एक नाहीं हजार उदाहरणे आयुष्यांत घडलीं असल्यामुळें मला वैयक्तिक श्री बाबांचे कौतुक व उपकारच मानाचे लागत आहेत, याचा अनुभव जो त्यांत सर्वस्वी त्यांचे चरणी लीन होऊन सुखदुःखाच्या समतोल भावनेनें समर्पण मंत्राचा ज्याला परिपाठ आहे अशाच अनुभवी भक्तगणास त्यांतील सखोलता व गोडी कळूं शकेल. मानवी कर्तव्य एवढेंच कीं, आपलें संसारीक कर्म पार पाडीत असतांना फलाच्या संपर्कावर अधिष्ठीत न रहातां आपली सर्वस्वी जबाबदारी श्री बाबावर सोंपविली असतां—वारंवार तेच समर्थ असतात व ठरतात, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

# 'श्रीसाई अवतारार्ची वैशिष्ट्यें'

( लेखांक २ रा )

लेखक : **केशव कृष्ण प्रधान**

**मा**गील लेखांत आपण श्रीसाई अवतारार्ची कांहीं वैशिष्ट्यें पाहिलीं. परंतु माझ्या मतें श्रीसाई अवतार हा वैशिष्ट्यानें संपूर्ण व सर्वांगीण भरलेला आहे.

खरें म्हणावयाचें म्हणजे ज्याप्रमाणें पूर्ण वाढ झालेल्या रसरशीत झाडाला त्या त्या ऋतूंत सुगंधी फुलें येतात किंवा पूर्णतेला पोहोंचलेल्या फळांच्या आंत परिपक्वता रसनिर्मिती करते त्याप्रमाणे पूर्ण परब्रह्म स्थितीपर्यंत पोहोचलेल्या महात्म्यांच्या ठिकाणीं सिद्धी आपोआपच फलद्रूप होऊं लागतात. हा जवळ जवळ निसर्गनियमासारखाच ठरलेला नियम आहे. त्या सिद्धींचा उपयोग जाणूनबुजून करावयाचा किंवा नाहीं हा तारतम्य भावाचा प्रश्न आहे. व्यवहारिक संकटांनी नाडलेला आणि श्रीसाईबाबांना शरण गेलेल्या साईभक्तांना श्रीसाईबाबांच्या केवळ आशीर्वादानें इच्छापूर्तीचा पूर्ण अनुभव आला. अशी शेंकडो उदाहरणें श्रीसाई चरित्रांत आहेत. त्या प्रत्येक वेळी श्रीसाईबाबांनीं जाणूनबुजून आपल्या सिद्धीचा उपयोग केला असें मानणें चुकीचें आहे. सत्पुरुषांचा परमेश्वराशीं इतका मिलाफ झालेला असतो कीं, त्याचें भले व्हावें अशी सत्पुरुष इच्छा करतात व त्यांचे परमेश्वरच भले करतो; आणि म्हणूनच आपण सत्पुरुषांना शरण जाऊन त्यांचा आशीर्वाद घेत असतों. आपले भलें होण्याकरिता तशी इच्छा करण्यापलीकडे सत्पुरुषांना दुसरे कांहींएक करण्याची जरूरी नसते. 'अल्ला भला करेगा' 'अल्ला मनकी मुराद पूरा करेगा' या श्रीसाईबाबांच्या उद्‌गारांत श्रीसाईनीं हेंच सत्य ग्रथीत केलेलें आहे.

## मी कांहीं करीत नाहीं !

श्री. माधवराव देशपांडे यांच्या भावजयीला प्लेगची भावना झाल्यावर 'तिच्याकडे फक्त उदी पाठवून दे, तूं स्वतः जाऊं नकोस, अल्ला अच्छा करेगा' अशा तऱ्हेचे श्रीसाई बाबांचे उद्‌गार; किंवा दुसऱ्या दिवशीं श्री. माधवराव तिला पाहून आल्यावर "देवा तूं बसल्या जागी वावटळ उठवतोस व तूंच ती शांत करतोस" अशा माधवरावांनीं काढलेल्या उद्‌गाराला श्रीसाई बाबांनीं दिलेलें उत्तर

"मी कांहीं करत नाहीं. करता करविता परमेश्वर आहे. तो अनलहक्क आहे" या व इतर गोष्टी वरील विधानाची सत्यता पटाविण्यास समर्थ आहेत.

सत्पुरुषांची परमेश्वराशी झालेली एकरूपता इतकी अभेद्य असते कीं, मी स्वतः कांहीं करीत आहे असें वाटावयास लावणारा त्यांच्यातला 'मी' भावच परमेश्वरांत पूर्ण विलीन झाल्यामुळें परमेश्वराची निव्वळ कळसूत्रें असण्यापलीकडे ते स्वतःला महत्त्व देत नाहींत. अशा तऱ्हेची परमेश्वराशीं एकरूपताच संतांमार्फत जगाचें फार मोठें कल्याण साधत असते. श्रीसाई सत्-चरित्रांतील अनेक चमत्कार ह्या लेखाचेंच दाखले आहेत. इतकेंच नव्हे तर श्रीसाई सत्चरित्रांत कांहीं ठिकाणीं श्रीसाई बाबांनीं असे कांहीं विशिष्ट तऱ्हेचे चमत्कार केलेले आहेत कीं, तेथें वाचकांना साहजिकच असें वाटतें कीं, श्रीसाईबाबांनीं येथें आपल्या ठिकाणची सिद्धी मुद्दाम आणि पुरेपूर वापरली असावी. उदाहरणार्थ जामनेर येथें नाना चांदोरकरांची मुलगी प्रसूतीला अडली असतांना शिरडीहून मुद्दाम अडकरांनीं केलेली आपली आरती व उदी रामगीरबुवा गोसावी यांच्या हस्तें जामनेरला पाठविण्याची केलेली व्यवस्था. या उदाहरणांत पदोपदीं श्रीसाईबाबांनीं आपल्या ठिकाणची सिद्धी पुरेपूर उपयोगांत आणलेली दिसते. रामगीरबुवाजवळ धड जळगावहून जामनेरला जावयास पुरे पैसेही नसताना व त्यानें तसें श्रीसाईबाबांना स्पष्ट सांगितलें असतांना श्रीसाई बाबांनीं "तुझी सर्व व्यवस्था ठीक होईल" असें त्यास सांगून पुरेसे पैसे न देतांच पाठवून दिलें व नंतर त्याला नेण्यासाठीं एक कल्लेदार रजपूत शिपाई व त्याच्याबरोबर एक सुंदर घोड्याचा टांगा निव्वळ सिद्धीनें जळगांव स्टेशनवर निर्माण करून रामगीरबुवांना जामनेरला नेण्यासाठीं पाठवला व अशा तऱ्हेनें त्यांना अगदीं वेळेवर चांदोरकरांच्या घरीं पोहोंचविलें.

## परमेश्वराशीं अभेद्य ऐक्य

त्याचप्रमाणें श्री. मानकर यांस पुणें स्टेशनवर मुंबईचें तिकीट काढून देण्यास एका कुणब्याचा वेष घेऊन त्यांनीं मदत केली व पैसे न घेतां तें तिकीट त्यांना फुकटच दिलें. तसेंच डहाणू येथें श्री. देव मामलेदार यांच्याकडे ते एका संन्यासाचें रूप घेऊन व बरोबर सिद्धीनें दोन मुलें निर्माण करून उद्यापनाच्या दिवशीं जेवावयास निमंत्रणावरून हजर झाले. किंवा ठाणें येथें अप्पा कुलकर्णी यांच्याकडे फकीराच्या वेषानें जाऊन त्यांच्याकडून दक्षिणा म्हणून नऊ रुपये घेऊन आले. या वरील उदाहरणांत किंवा मागील लेखांकातील अकबर बादशहाच्या उदाहरणांत शिरडी येथील द्वारकामाई न सोडता दूर शेंकडों मैलांवर स्वतः नेहमीच्या किंवा दुसऱ्या स्वरूपांत प्रगट होणें व विश्वामित्रासारखी प्रतिसृष्टी निर्माण करणें वगैरे चमत्कार सकृत् दर्शनी श्रीसाईबाबांची सिद्धी वापरायची उदाहरणें म्हणून दाखविण्याचा वाचकांना मोह होतो.

परंतु आपण जर यावर खोल विचार केला तर आपणास असें दिसून येतें कीं, ही तुरळक उदाहरणें सुद्धां श्रीसाईबाबांवरील परमेश्वराच्या निस्सीम प्रेमामुळें किंवा त्यांच्या परमेश्वराशी असलेल्या अभेद्य ऐक्यामुळें त्यांच्यासाठीं खुद्द परमेश्वरानेच केलेले चमत्कार असावेत. इतर साधुसंतांच्या चरित्रामध्यें या विधानाला पाठिंबा देणारे पुरावे मिळतात.

श्री दामाजीपंतांनीं बेदरच्या सुलतानाकडे विठू महाराचें रूप घेऊन दुष्काळांत वांटलेल्या धान्याची किंमत पुरेपूर भरून देणारे श्रीविठ्ठल, सांवता माळ्याची भाजी खुडणारा देव, जनाबाईची लुगडीं धुणारा, सखुबाईची दळणें दळणारा, नरसिंह मेहेतांची हुंडी पटवणारा पांडुरंग श्रीसाईबाबांच्या मदतीला या ना त्या रूपानें धांवून जाऊन मदत न करणें अशक्य नाहीं. आपल्या कोत्या बुद्धीला मात्र श्रीसाईबाबांनी स्वतःची सिद्धी वापरली असावी असें वाटतें. देहूच्या देवळांत श्रीतुकारामबुवा कीर्तन करीत असतां प्रत्यक्षच पांडुरंगानें मुसलमानांच्या वेढ्यांत सांपडलेल्या श्रीशिवरायांना नाना शिवरूपें स्वतः घेऊन तारल्याचें उदाहरण अलीकडील इतिहासांत जमा झालेंच आहे. त्यावेळीं श्रीतुकाराम महाराजानी ‘तुका म्हणे माझी लाज गेली देवा’ असा कळवळून पांडुरंगाच्या नांवाने टाहो फोडला होता. ज्यावेळीं तो चमत्कार झाला ती तुकाराम महाराजानी वापरलेली स्वतःची सिद्धी नव्हती, तें ह्या उदाहरणावरून पटून येईल. तेव्हां सर्व सिद्धींनीं पूर्ण असलेले श्रीसद्गुरु साईबाबा त्यांच्या ठिकाणची शक्ति असे मोठाले चमत्कार करण्यात हमखास वापरत असत असे म्हणणें धाडसाचें काम होईल.

**खिस्ताचें उज्वल उदाहरण**

भगवान येशू खिस्ताच्या आयुष्यांत कित्येक अंधांना दृष्टी प्राप्त झाली, कित्येक महारोगी पूर्ण बरे झाले. एक दोन मृत जीव जिवंत होऊन परत भूमितलावर वावरूं लागले वगैरे चमत्कार आपण वाचतों. हे चमत्कार श्री येशू खिस्तानीं दर खेपेला ‘In the name of my father in heaven’ असें म्हणूनच केले ही गोष्ट विसरल्यामुळें त्यावेळच्या धर्मगुरूंनीं त्यास ‘Miracle Maker’ म्हणजेच ‘चेटूक करणारा’ असे मानून सुळावर चढविले व आज सुद्धां बहुजन ज्यू जमात भगवान् येशू खिस्तास जुन्या Testament मध्यें जाहीर केलेल्या देवाचा दूत न मानतां एक ढोंगीच समजते. तात्पर्य काय कीं, सत्पुरुषांच्या निव्वळ इच्छामात्रे त्यांचे दिलेले आशीर्वाद परमेश्वर शक्तीच पुरे करते हे श्रीसाई चरित्रावरून आपणास दिसून येईल. साईचरित्रांत पदोपदीं अशा तऱ्हेच्या इच्छापूर्तीची असंख्य उदाहरणें आहेत. त्यांमधून आपणास श्रीसाईबाबांची परब्रह्माबरोबर झालेली एकात्मता पुरी दृष्टीस पडते. स्वतःच्या सिद्धीबलावर चमत्कार करून ( म्हणजे स्वतःच्या सिद्धीचा दुरुपयोग करून ) मीच प्रत्यक्ष परमेश्वर आहे, असे लोकांस दाखवून त्यांची दिशाभूल करणारे पुष्कळ मांत्रिक,

तांत्रिक व साधू म्हणून घेणारे आपल्याला आढळतात. परंतु त्यांच्यामध्यें व सत्पुरुषांच्यामध्यें एक फार मोठा फरक असतो. मानवाच्या विविध इच्छा पुऱ्या करण्यामागें त्यांना परमार्थाकडे लावणें हाच तो उद्देश होय. वरील जातीचे लोक परमेश्वरापेक्षां स्वतःचेंच नांव व प्रतिष्ठा वाढवण्यासाठीं सिद्धीचा उपयोग करतात. श्रीसाई चरित्रांत युक्ती–युक्तीनें सर्व व्यवहारिक इच्छापूर्तीसाठीं आलेल्या लोकांना श्रीसाईबाबांनीं परमार्थाकडे लावण्याचीच सर्व उदाहरणें आहेत, हे श्रीसाई चरित्र नीट काळजीपूर्वक वाचणाराच्या लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं.

## तीन जन्मांचें ज्ञान

वर दिलेल्या मोठमोठ्या चमत्काराशिवाय दुसऱ्याहि कांहीं तऱ्हेचे चमत्कार श्रीसाई सत्चरित्रांत आपणास दिसतात. त्यामध्यें श्रीसाई बाबांचे इतरांच्या पूर्व–जन्माबद्दलचें ज्ञान, व इतरांच्या आयुष्यामध्यें पुढें घडणाऱ्या गोष्टींचें ज्ञान या श्रीसाईबाबांच्या शक्तीचा प्रामुख्यानें निर्देश करावा लागतो. श्रीसाई सत्चरित्राच्या ४७ व्या अध्यायांत अहीको मंडूक याची कथा आलेली आहे. त्यामध्यें त्यांतील व्यक्तींच्या मागील तीन जन्मांची हकीगत श्रीसाई बाबांनीं प्रत्यक्ष पाहून श्रीसाई भक्तांना सांगितली आहे. त्या व्यक्तीच्या मागील सर्व तिन्ही जन्मांत श्रीसाई बाबा स्वतः त्यांच्या या जन्माप्रमाणेंच सिद्ध पुरुषाच्या भूमिकेंत आपल्याला दिसतात व त्यांना स्वतःच्या व इतरांच्या तीन जन्मांतील पूर्ण ज्ञान प्राप्त झालेलें दिसतें. मागील लेखांकातील अकबराच्या कथेंत श्रीसाईबाबांनीं आपल्या मागील एकाच जन्माबद्दल सांगितलें आहे.

श्रीबुद्धदेवाला गया येथें अशोकाच्या झाडाखालीं आपल्या मागील पूर्वजन्माचें ज्ञान इतक्या विषद तऱ्हेनें प्राप्त झाले होते कीं, अगदीं व्याघ्र योनींतील झालेला त्यांचा जन्म सुद्धां त्यांना सांगता आला असा बुद्ध चरित्रांत उल्लेख आहे. त्या दृष्टीनें पाहता श्री. खापर्डे यांच्या कुटुंबास ही पूर्वजन्मी एक लठ्ठ दुधाळ गाय होती, तेव्हां ती एका वाण्याच्या घरीं होती; त्यानंतर ती एका क्षत्रियाच्या घरीं जन्माला आली. नंतर ती एका ब्राह्मणाच्या घरांत जन्माला आलेली आहे, हें त्यांनीं सांगितल्यास नवल नाहीं. तसेंच एका बकऱ्याच्या कळपांतून दोन बकऱ्या विकत घेऊन त्यास चारापाणी देऊन परत त्यांना धनगराच्या स्वाधीन करतांना हे दोघे पूर्वजन्मीं भाऊ होते व ते मजजवळच बसत असत, पण पुढें धनलोभानें त्यांनीं एकमेकांस ठार मारले, वगैरे उद्गार वरील विधानाची सत्यता पटविणारे आहेत. महात्म्यांना ईश्वराशीं ऐक्य झाल्यामुळें त्रिकाल दृष्टी प्राप्त होतें असें आपण पुराणांत वाचतों व पूर्वीच्या ऋषींना ती दृष्टी होती हेंही आपणास सोदाहरण पुराणांत लिहिलेलें आढळून येतें. त्यावरून श्रीसाई–

बाबांची गणना एखाद्या महान् अवतारांत किंवा ऋषीतुल्य पुरुषांमध्यें करणें योग्य होईल.

**संकटाची आगाऊ चाहूल**

पुढील संकटाची सूचना देऊन त्यास वेळोवेळीं सावध करून, इतकेंच नव्हे तर त्यांत त्यांच्या संकटांचें निवारण करून त्यांचें रक्षण करण्याची कामगिरी श्रीसाईबाबांनी आपल्या आयुष्यभर पार पाडली व अजूनहि ते अतींद्रिय सृष्टींतून पार पाडीत आहेत. जाण्यायेण्याच्या वेळा, आगगाडीच्या वेळा, कोर्टाच्या तारखा, कोर्टांचे निकाल, परीक्षेचे निकाल, आधींच आपल्या भक्तांना सांगून त्यांच्या गैरसोयी व चिंता श्रीसाईबाबांनी शेकड्यांनी दूर केल्या. सिरीकरांच्यावर किंवा बापूसाहेब आवटीवर होणारे सर्पदंशाचे प्रकार त्यांना वेळींच सूचना देऊन टाळले. लवकर किंवा उशीरा स्टेशनवर जाण्याबद्दल सूचना देऊन वाटेंतील अपघात, दरोडे, लूट या प्रकारांतून भक्तांना वांचविलें व इतकेंहि करून त्यांची गाडी न चुकण्याची खबरदारी त्यांनीं घेतली. उशीरा सुटणाऱ्या गाड्यांची, वेळेवर स्टेशनवर न येणाऱ्या गाड्यांची अगोदरच भक्तांना सूचना देऊन त्यांचा निष्कारण फुकट जाणारा वेळ व त्रास वांचविला. वयोवृद्ध माणसांना नोकरीनंतर योग्य तें पेन्शन द्यावयास लावणें, नोकरी नसणाऱ्यांना नोकरी देणें, परीक्षेला यश न येणाऱ्या विद्यार्थ्यांना यश मिळवून देणें, मुलबाळ नसलेल्या स्त्रियांना संतति देणें हीं कार्यें श्रीसाईबाबांनीं स्वेच्छेनें करून दाखविलीं. तसेंच वैद्यशास्त्रांत न लिहिलेलीं औषधें व उदी वापरून किंवा निव्वळ आपल्या आशीर्वादानें लोकांचे असाध्य रोग बरे केले. थोडक्यांत या संसारांत होणाऱ्या व्यवहारांतील नाना तऱ्हेच्या अडचणींपासून आपल्या भक्तांचें संरक्षण केलें. श्रीसाई चरित्राचीं अशीं अनेक वैशिष्ट्यें आहेत कीं, त्यांचें साद्यंत वर्णन करणें जरी शक्य नसलें तरी देखील ती थोडक्यांत लिहून वाचकांस सादर करण्यास असे बरेच लेखांक लिहावे लागतील.

---



# बाबांनीं चुडेदान दिलें !

लेखक : प्र. श्री. जठार, मुंबई

माझी एक नात्यांतील बहीण आहे. जुन्या काळांतील साधीभोळी, दोनचार पुस्तकें शिकलेली. बाळबोध वळणाची व बाबांवर विश्वास ठेवणारी. तिला श्री साईंबाबानीं कसें चुडेदान दिलें त्याची ही प्रत्यक्षांतील सत्यकथा आहे.

× × ×

तिचे यजमान पुष्कळ आजारी होते. सर्व डॉक्टरी इलाज थकले व छातीचा फोटो काढण्यांत आला. डॉक्टरानें कपाळाला हात लावला व म्हणाला, "बाई! तुझा नवरा अगदीं थोड्या दिवसांचा सोबती आहे! त्याचें दोन्ही लंग्स (फुफ्फुसें) साफ सडून गेलीं आहेत व आतां डॉक्टरी उपाय कांहीं फायदा देणार नाहीं. तुम्हीं उगाच पैसा खर्चूं नका व पेशन्टला पण त्रास देऊं नका."

झालं, ती बाई ढसढसा रडूं लागली. नुकतेंच लग्न झालेलें. आतां काय करावें, कोणत्या देवाची करुणा भाकावी, कोणाकडे जावें हा प्रश्न पडला. तो आईचा एकटाच मुलगा.

शेवटीं त्या बाईनें सांगितलें, "सासूबाई, मी ह्यांना शिर्डीच्या साईबाबांच्या पायांवर नेऊन घालते. तेच आतां ह्यांचें रक्षण करतील. माझं सौभाग्य आतां तेच सांभाळतील."

सासूबाईनें वैद्यकशास्त्राचा खूप अभ्यास केला होता. त्यांना शेवट माहीत होता व मृत्यूपण प्रत्यक्ष दिसत होता. त्यांना ह्या भाबड्या व निष्पाप सुनेची समजूत कशी घालावी हा प्रश्न पडला. त्या म्हणाल्या, "मुली, तुझी इच्छाच असेल व तुला जर वाटत असेल कीं, इतकी शेवटास गेलेली केस बाबा बरी करतील तर तूं अवश्य जा. मी तुझी निराशा करीत नाहीं. पण आतां मला माझ्या मुलाची आशा तुटली आहे. कां तर सर्व पाश्चात्य व प्रसिद्ध डाक्टरांचा मी सल्ला घेतला आहे. आतां तूं व तुझे नशीब! मीही साईबाबांवर हवाला टाकत आहे. असें म्हणून तिनें शंभराच्या पांच नोटा तिच्या हातांत दिल्या.

त्याच दिवशीं तीं नवराबायको शिरडीस जावयास निघालीं. गाडीचा पहिल्या

वर्गाचा प्रवास कसा होईल व रस्त्यांत प्रकृति जास्त कमी झाल्यास काय करावें हें पण त्यांना सुचल नाहीं. बाबांचा धांवा करीत ते शिरडीस पोहोंचले. एक महिन्यासाठीं खोली मिळाली. बाई प्रवासानें व नवऱ्याच्या प्राणभयानें घाबरून गेलेली, दमलेली, इतर कोणाचा आधार नाहीं, वय अवघें सतरा–अठरा वर्षांचें. पुढील आयुष्याचें भयाण चित्र समोर दिसत होतें. ह्यामुळें गांगरून गेलेली व शिरडीस पहिल्यांदाच गेलेली, कोणाची ओळख नाहीं; चिठ्ठी नाहीं. फक्त साईबाबांची कीर्ति ऐकलेली. "भोळा–भाव!" सामान कसेंतरी खोलींत ठेवलें. नवऱ्याला अंथरूण घालून त्यावर झोपवलें. क्षयाची भावना त्यांत थकवा; त्यामुळें तो बिचारा मृतप्राय पडलेला! बाईनें कडी लावली व जवळच ह्यात्रीवर झोपली. इतक्यांत दार खडखडलें. कडी निघाली व एक वृद्ध ब्राह्मण पितांबर नेसलेला व गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा घातलेला असा आला व म्हणाला, "तुम्हांला आरतीला यावयाचें आहे ना? चला दर्शनाला."

बाई म्हणाल्या, "आम्ही आतांच आलों आहोंत, आम्हांला इकडील पद्धत माहीत नाहीं. शिवाय आमच्या ह्यांची तब्बेत ही अशी व आम्ही फार दमलों आहोंत तरी मी बाबांना येथूनच नमस्कार करतें व सावकाशानें दर्शनास येते. त्या वृद्ध ब्राह्मणानें एकदां माझ्या नवऱ्याकडे पाहिलें व बरें आहे म्हणाला, व तो परत गेला. मला आश्चर्य वाटलें म्हणून मी माझ्या यजमानांना उठविलें व विचारलें,

"कांहो? ह्या खोलींची कडी आपोआप बाहेरून कशी उघडते?"

"कडी कुठें उघडली आहे? मला तर ती लावलेली दिसत आहे."

"अहो! मग आतां एक ब्राह्मण कसा आंत आला?"

"अग तुला स्वप्न पडलें असेल! कोणी आला नाहीं येथें. मी जागाच आहें."

बाईला मोठें आश्चर्य वाटलें. थोड्या वेळानें बाईनें एक चादर समाधानासाठीं घेतली. चादरी सर्व संपल्या होत्या व एकच सहा रुपयांची चादर होती. ती बाईनें बाबांसाठीं घेतली.

कोणत्यातरी संस्थानांतून एक राजा आला होता. त्याची चादर व मोठा थाटमाट चालला होता. म्हणून बाईनें विचार केला आपण लांब एका कोपऱ्यांत उभें रहावें. आमल्यासारख्याला ह्या दरबारांत कोण विचारणार व उगीच हंसें मात्र होईल. पण बाबांना भक्तांचा कैवार फार. इतक्यांत एक ब्राह्मण ओरडत आला कीं, "दादरहून आलेल्या पाहुण्याची चादर पहिल्यांदा चढवा." झालें, बाईला गहिंवरून आलें व आपली चादर तिनें पुढें केली. बाईनें भक्तीभावानें नमस्कार केला व आपलें गाऱ्हाणें बाबांना घातलें व खोलीवर परत आली. दूध गरम करून

नवऱ्याला पाजलें व आपण जेवली. दुपारची वेळ झाली होती. म्हणून जरा झोपली. पुन्हां दार ठोठावलें गेलें व तोच ब्राह्मण परत आला.

"तुम्हीं आतां खुशाल दादरला जा!"

"अहो, पण आम्ही महिनाभर रहावयास आलों आहोंत व महिन्याचें भाडें पण भरलें आहे. ह्यांना हवापालट पण होईल."

"छे, छे, आतां रहाण्याची कांहीं गरज नाहीं."

बाई जागी झाली व नवऱ्याला पुन्हां जागें केलें व म्हणाली, "तो ब्राह्मण काय म्हणाला तें ऐकलेंत काय?"

"कपाळ नि कर्म! अग कुठचा ब्राह्मण आणि कोण आला होता? कोणीही आलेला नाहीं येथें! मी हा असा खोकत बसलों आहे! तुला कसला भ्रम झाला आहे; कोण जाणे!"


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारीं उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम... यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



८५ बापू खोटे स्ट्रीट,
जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

साखरकर

"अहो पण तुम्ही ऑफिसांत खालीं जाऊन चौकशी तर करा, कोण आला होता तो समजत नाहीं बाई!"

माझे यजमान व मी ऑफिसांत खालीं गेलों व ब्राह्मणाची चौकशी केली. तेथें वृद्ध ब्राह्मण कोणीच नव्हता पण ऑफिसमधल्या कारकुनानें आम्हांला सांगितलें, "तुम्हांला जाण्याची आज्ञा मिळाली आहे. तुम्ही अगदीं आनंदानें घरीं जा" व त्यांनीं आम्हांला भरलेलें भाडें परत केलें. आम्हीं गाडींत जाऊन पहिल्या वर्गाचा डबा मुंबईस जाण्यासाठीं पकडला. ह्यांच्या प्रकृतींत कांहींच आराम दिसत नव्हता. पण मला मात्र बाबांना भेटल्याचें समाधान वाटलें व धीर आला होता. माझें पण थोडें नर्सिंग झालें होतें. म्हणून मी ह्यांच्या अंगाला हात लावून पाहिलें तर अंग थंड पडत चाललें होतें व शेवट जवळ आलासा वाटत होता. म्हणून गरम रग त्यांच्या अंगावर घातला व मन घट्ट केलें. गाडींतूनच बाबांना हात जोडले कीं, तुझी मर्जी. थोड्या वेळानें नाडी पाहिली तर ती सुंदर चालत होती व रग आणि सर्व बिछाना पाण्यानें चिंब भिजला होता. जसें काय कोणी पाणी ओतावें. मी लगेच सुके कपडे त्यांना घातले. त्यांनीं माझ्याकडे चहा व बिस्कीटचा पुडा मागितला. किटलीभर चहा व सर्व पुडा त्यांनीं फस्त केला. मी बघतच राहिलें. दादर स्टेशन आलें. स्वारीनें स्वतःच बॅग उचलली व खाली उतरले. ह्यांना एवढें बळ कुठून आलें? झटका तर आला नाहीं ना? मला शंका आली. एक ना दोन हजार विचार मनांत थैमान घालूं लागले.

"अहो तुम्हीं त्रास घेऊं नका."

"अग मला आतां छान बरें वाटतें. आपण चालतच घरीं जाऊं." ते म्हणाले.

"तर! तर!" मी म्हणालें व टॅक्सी केली. न दमतां स्वारी जिना चढून वर घरांत आली. सासूबाई आश्चर्यानें थक्क झाल्या व मला त्राजूला घेऊन कानांत हळूंच म्हणाल्या, "पोरी हें शेवटचें बळ बरं का? मला लक्षण टीक दिसत नाहीं! मी डॉक्टरला बोलावतें. थोड्या वेळानें डॉक्टर आले व हंसत परत गेले. दुसऱ्या दिवशीं 'एक्सरे' काढला. फुफ्फुसें पूर्ण सुधारलेलीं. पस्तीस वर्षें झाली ह्या गोष्टीला, पण पुन्हां कसलाही रोग नाहीं. मला बाबांनीं चुडेदान दिलें असेंच मी म्हणतें.



# इंद्रियांचें भयंकर सामर्थ्य

## ज्ञानेश्वरांनीं केलेली मीमांसा

—गुरुदेव रानडे

### इंद्रियांचें बळकटपण

आतां श्रीज्ञानेश्वरांच्या नीतिविषयक शिकवणीचा विचार आपण करूं. या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. ती म्हणजे इतर संतांप्रमाणें ज्ञानेश्वरांचाहि इंद्रियांवर विश्वास नाहीं. "या इंद्रियांचें बळ इतकें जबरदस्त असतें कीं, जे योगाभ्यास करतात व आपल्या मुठींत धरलेलें असतें, अशा योग्यांना देखील, हीं इंद्रियें इडलीनें मंत्रज्ञाला भुलवावें त्याप्रमाणें, कासावीस करून टाकतात! योगाभ्यास बळावला असतां, नवीन विषय व नवीन शक्ती निर्माण करून, हीं त्या योग्याच्या मनास भुरळ पाडतात व त्यास योगाभ्यासापासून च्युत करतात, इतकें भयंकर सामर्थ्य या इंद्रियांमध्यें आहे."

### अमानित्व

इतर नीतिशास्त्रज्ञांप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांनींहि इंद्रियांचें सामर्थ्य केवढें आहे हें सांगितलें आहे; परंतु, अनेक सद्‌गुणांचें जें सखोल व मार्मिक वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं केलें आहे, त्यांत त्यांची उच्च प्रतिभा व त्यांचे विशेष गुण दिसून येतात. तेराव्या अध्यायांत खऱ्या परमार्थास लागणाऱ्या सर्व सद्‌गुणांचें विस्तृत वर्णन दिलें आहे, त्याचा श्रीज्ञानेश्वरांना आधार म्हणून फार उपयोग झाला आहे. प्रत्येक सद्‌गुणाचें महत्त्व वाचकांच्या मनावर पूर्णपणें बिंबविण्याकरितां श्रीज्ञानेश्वरांनीं इतकीं रूपकें वापरलीं आहेत कीं, अलंकारिक भाषेंत नीतिशास्त्राचें वर्णन करणाऱ्या सर्व लेखकांत ते श्रेष्ठ ठरतात, यांत शंकाच नाहीं. या अलंकार–संभाराशिवाय नीतिशास्त्राचें विवेचन रुक्ष व नीरस झालें असतें. या प्रत्येक सद्‌गुणाचें वर्णन करतांना किती भरपूर माहिती श्रीज्ञानेश्वरांनीं दिली आहे याची कल्पना पुढें दिलेलें वर्णन वाचून वाचकांस सहजीं येईलच. प्रथम अमानित्वाचें वर्णन पाहूं: "ज्यास स्तुतीचा प्रत्येक शब्द ओझ्यासारखा वाटतो, तोच खरा नम्र पुरुष होय. त्याच्या अंगीं खरोखरच असलेल्या गुणांचें वर्णन केलें तरीही तो व्याधानें अडविलेल्या हरणाप्रमाणें गोंधळून जातो,

सन्मान केला असतां, भोंवऱ्यांतून पोहणाऱ्याचे दोनहि हात दमून संकोच पावतात, त्याप्रमाणें तो संकोच पावतो. तो मोठेपणा अंगीं येऊंच देत नाहीं. पूज्यता डोळ्यांनीं पाहूं नये, स्वकीर्ति कानांनीं ऐकूं नये, हा अमूक आहे अशी आठवणहि लोकांना उरूं नये अशी त्याची इच्छा असते. नमस्कार केला असतां त्यास मरणप्राय दुःख होतें. बृहस्पतीसारखा सर्वज्ञ असला तरी लोकांमध्यें आपली कीर्ति होईल या भीतीनें तो वेडामध्यें दडून राहातो, चातुर्य लपवितो, महत्त्व घालवितो व आवडीनें पिसेपण मिरवितो. जगानें अवज्ञा करावी व नातलगांनीं सोयरीक टाकावी, अशी त्याची तीव्र इच्छा असते. हा जिवंत आहे का मेला आहे याची कल्पनाहि लोकांस येऊं नये, इतक्या शांतपणें राहावें असें त्यास वाटतें. तो इतक्या हळुवारपणें चालतो कीं, तो चालतो का वाऱ्यानें ढकलला जातो याचा लोकांस भ्रम पडावा! "माझें जिवंतपणा लोपूं दे, नामरूप नाहींसें होऊं दे व सर्व भूतमात्रें मला सोडून जाऊं देत" असें तो म्हणतो. "असा पुरुष नेहमीं एकान्त सेवितो व जणूं एकान्तामुळेंच जगतो. तो वाऱ्याशीं मैत्री करतो, आकाशाशीं बोलतो व रानांतलीं झाडें त्यास स्वतःच्या जिवाइतकीं प्रिय वाटतात." पुनः नवव्या अध्यायांत देखील श्रीज्ञानेश्वरांनीं संतांच्या या नितान्त नम्रतेचें वर्णन केलें आहे. असे संत ब्रह्मापासून चिलटापर्यंत सर्व भूतमात्रांना आपल्यासमान लेखतात. ते पाहिलेल्या सर्व वस्तू लहान-मोठ्या न म्हणतां वा सजीव वा निर्जीव न जाणतां आपलें स्वरूप असे समजून सरळ दंडवत घालतात. ते आपला मोठेपणा आठवत नाहींत; दुसऱ्याची कृति योग्य कीं अयोग्य हें ते जाणत नाहींत; कोणाहि व्यक्तीचें नांव घेतलें कीं एकसारखें नमन करणेंच त्यांना आवडतें. जसें पाणी उंचावरून निमुटपणानें खालीं वाहत येतें, त्याप्रमाणें पाहिलेल्या प्रत्येक प्राणिमात्रास नमन करणें हा त्यांचा स्वभाव बनतो. किंवा फळांनीं झाडाच्या फांद्या भरल्या म्हणजे त्या सहजच खालीं लवतात, त्याप्रमाणें अखिल जीवमात्रांपुढें ते नम्र होतात.

**अदंभित्व**

"कृपण ज्याप्रमाणें प्राण गेला तरी आपला ठेवा उघडा करीत नाहीं, त्याप्रमाणें अदांभिक पुरुष प्राण-संकटीं पडला तरी आपलें सुकृत आपण होऊन शब्दांनीं प्रकट करीत नाहीं. ज्याप्रमाणें लाथरी गाय आलेला पान्हा पळविते किंवा प्रवासांत धनिक आपलें धन लपवितो किंवा कुलवधू आपले अवयव लपविते किंवा शेतकरी पेरलेलें धान्य झांकतो, त्याप्रमाणें अदांभिक आपलें दान लपवितो. तो कोणाची पूजा करीत नाहीं, कोणाची खुशामत करीत नाहीं. आपला धर्म वाग्ध्वजावर बांधून फडफडत ठेवणें त्याला माहीत नसतें. शरीर-भोगांविषयीं तो अतिशय कृपण असला, तरी धर्मांविषयीं थोडेंबहुत मुळींच म्हणत नाहीं. घरीं आपत्तीनें गांजला असला,

तरी दानाच्या बाबतींत तो कल्पतरूशीं पैज मारतो. तो स्वधर्मी थोर व योग्य ठिकाणीं उदार असतो. तो आत्मचर्चेंत चतुर व इतर विषयांत जणुं वेड्यासारखा असतो. केळीचें झाड वस्तुतः हलकें व पोकळ असतें, तरी त्याचीं फळें फार जड व रसानें भरलेलीं असतात. किंवा मेघाचें अंग जणूं वाऱ्यानें उडून जाईल इतकें हलकें दिसतें, परंतु त्यापासून मुसळधार वर्षाव होतो! या चिन्हांचा ज्याच्यामध्यें उत्कर्ष झाला, त्याच्या अंगीं अदांभिकत्व पूर्णपणें बाणलें असें जाणावें."

## अहिंसा

यानंतर श्रीज्ञानेश्वरांनीं अहिंसेचें वर्णन केलें आहे. अहिंसा अनेक प्रकारची असते. शरिरानें, शब्दानें किंवा मनानें कोणासहि यत्किंचित् देखील न दुखविणें ही अहिंसा होय. या तीनहि प्रकारच्या अहिंसेचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं फार उत्तम प्रकारें केलें आहे. "आदर्श संत पाण्याची स्थिरता मोडेल या भीतीनें कोणत्याहि प्रवाहांतून जात नाहींत. बगळा ज्याप्रमाणें पाण्याच्या लाटा न ओलांडतां वा न फोडतां व पाण्याची स्थिरता न मोडतां, हळुवारपणें पण वेगानें आपल्या अभिलाषाकडे लक्ष देऊन पाण्यांत पाऊल टाकतो, त्याप्रमाणें ज्यांच्या अंगीं अहिंसा–तत्त्व पूर्णपणें बाणलें आहे असे संत आपल्या ध्येयाकडे पूर्ण लक्ष देऊन पृथ्वीवर पाऊल टाकतात. केसर चुरडून गळेल काय या शंकेनें भुंगा कमळावर अत्यंत हळुवारपणें पाय ठेवतो, त्याप्रमाणें प्रत्येक परमाणूंत सूक्ष्म जीव लपेटून राहिले आहेत, हें जाणून कारुण्यपूर्ण अंतःकरणानें ते आपलीं पावलें जपून टाकतात. ते चालतात तो मार्गच कृपेचा बनवितात, दिशा प्रेमानें भरून टाकतात व सर्व जीवांच्या खालीं जणूं आपला जीवच आंथरतात! आपल्या दातांचीं तीक्ष्ण टोंकें लागतील कीं काय या भीतीनें अगदीं हळुवारपणें मांजरी आपल्या पिलांना आपल्या तोंडांत धरते, त्याप्रमाणें ते अति हळुवारपणें पृथ्वीवर चालतात. "कृतार्थ झाल्यामुळें सिद्ध पुरुषांचे मनोरथ जसे निर्व्यापार राहतात, त्याप्रमाणें त्यांचे हात कांहीं व्यवहार करीत नाहींत. वाऱ्याला हिसडा बसेल किंवा आकाशाला नख लागेल म्हणून ते आपले हात मुळींच हलवीत नाहींत; अंगावर बसलेली किंवा डोळ्यांत शिरूं पाहणारी माशी ते झाडून टाकतील, किंवा पशुपक्ष्यांकडे रागानें पाहतील ही गोष्टच कशाला? ते एकादी काडी सुद्धां उगारीत नाहींत, मग शस्त्रांचा प्रश्न निघतोच कशाला? लीलेनें कमळ हातीं धरणें किंवा फुलांची माळ झेलणें हें त्यांना गोफणीनें दगड मारण्याइतकें कठोर वाटतें! ते अभय देण्यासाठीं हात उचलतात, पडलेल्यास वर उचलण्यासाठींच हात देतात किंवा आपत्तीनें गांजलेल्यांना कुरवाळण्यास आपल्या हातांनीं हळुवारपणें त्यांच्या अंगास स्पर्श करतात. हें सर्व ते इतक्या जिव्हाळ्यानें व हळुवारपणें करतात कीं, त्यांच्या स्पर्शापुढें दक्षिणेचा मलय पर्वतावरून येणारा वारा देखील कठोर व खुपतोसा वाटतो! अशा पुरुषाची दृष्टि

देखील अगदीं निरुपद्रवी असते. सर्व वस्तुमात्रांत भरून असलेलें ब्रह्मरूप आपल्या नजरेआड होईल, या भीतीनें तो दुसऱ्या कोणत्याहि बाह्य वस्तूकडे पाहत नाहीं. तरी त्यानें एखादे वेळीं अंतःकरणाच्या कृपेच्या बळें डोळे उघडून पाहिलेच, तर त्याची दृष्टि चंद्रबिंबापासून निघणाऱ्या अमृतधारांपेक्षां कोमल व आनंददायक वाटते." "अशा श्रेष्ठ साधुपुरुषाची भाषाहि फार मृदु व कोणासहि न बोंचणारी असते. आधीं त्याच्या अंतःकरणांत स्नेह पाझरतो व मागून तोंडावाटे अक्षरें येतात. 'कृपा आधीं व मग शब्द' अशी त्याच्यां भाषणाची स्थिति असते. अशा पुरुषाचे शब्द कोणास खुपतील? कोणाच्या मनाची शांति भंगेल या भीतीनें अथवा कोणाची भुंवई किंचित वांकडी होईल म्हणून तो अबोलच राहतो. चुकून लोभानें वा आग्रहानें कोणाशीं बोलला, तर त्यास तो आईबापांसारखा वाटतो. त्याचे शब्द ऐकले कीं नादब्रह्मच जणुं आकारास आलें आहे असें वाटतें. त्याचे शब्द सत्य व मृदु, मोजके आणि रसाळ व अमृताचे जणुं कल्लोळ असे वाटतात. विरोध, वाद, जोर, मर्मभेद, उपहास, छळ, क्लेश, शंका, कपट व दगलबाजी इत्यादिकांना त्याच्या वाचेनें जणुं कायमचा रामराम ठोकला आहे, असें वाटतें." शेवटीं, त्याचें मनहि त्याच्या शरिराप्रमाणें किंवा वाचेप्रमाणें अत्यंत अहिंसात्मक असतें. कारण, मन जर मूलतः निरुपद्रवी नसेल, तर वाणी व कृति निरुपद्रवी असूंच शकणार नाहींत. प्रथम जमिनींत बीं पेरावें तेव्हां मग तें वृक्षरूपानें दृग्गोचर होतें, त्याचप्रमाणें मनाची कृति इंद्रियांच्या द्वारें प्रकट होते. आपल्यास हवी ती वृत्ति प्रथम मनांत उठते आणि मग ती वाचा, दृष्टि किंवा हात यांच्या द्वारें व्यक्त होते. म्हणून मनाचें मनपणच जेव्हां मोडतें, तेव्हां सूत्रधारावीण असलेल्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणें इंद्रियें आपोआप उपडीं पडतात. समुद्रास भरती येते तेव्हां खाड्या आपोआपच भरतात, त्याचप्रमाणें स्वसंपत्तीनें चित्त इंद्रियांस संपन्न करतें. अहिंसा म्हणजे काय हें ऐकावें, ग्रंथांतरीं पाहावें अशी जेव्हां कोणास इच्छा होते, तेव्हां त्यानें मूर्तिमंत अहिंसारूप अशा साधुपुरुषास पाहावें म्हणजे अहिंसेची पूर्ण कल्पना येईल.

## शांति व आर्जव

यापुढें क्षमा या सद्गुणाचें वर्णन ज्ञानेश्वरांनीं केलें आहे. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक या त्रिविध तापांचे समुदाय जरी त्याच्यावर कोसळले, तरी तो साधुपुरुष त्यांखालीं वांकत नाहीं. तो उन्हानें तापत नाहीं, थंडीनें कांपत नाहीं; कोणतीहि आपत्ति आली तरी तो भीत नाहीं. चराचर भूतमात्रामुळें पृथ्वीस दाटी झाली असें वाटत नाहीं, त्याप्रमाणें नाना प्रकारच्या द्वंद्वामुळें तो श्रमत नाहीं. समुद्र ज्याप्रमाणें पुरासकट आलेल्या नद्यांना आपल्या पोटीं जागा देतो, त्याप्रमाणें

पहन होत नाहीं असें कांहींच नाहीं. किंबहुना आपण सहन करतों ही जाणीवहि

त्यास राहत नाहीं. श्रीज्ञानेश्वरांच्या मतें ही स्वयंशांति होय. ऋजुतेचें किंवा सरळपणाचें वर्णन करतांना श्रीज्ञानेश्वर सांगतात कीं, " सूर्य ज्याप्रमाणें कोणताहि भेदभाव न करतां सर्वांस सारखा प्रकाश देतो, त्याप्रमाणें सिद्धपुरुष सर्वांशीं सारखा वागतो. आकाश ज्याप्रमाणें सर्वांसच जागा देतें, त्याप्रमाणें तो सर्वांनाच संभाळून घेतो, माणूस पाहून त्याचें मन किंवा वर्तन बदलत नाहीं. अनादिकालापासून सर्व जगच त्याच्या ओळखीचें आहे. जुनाट सोयरीक असल्यामुळें, आपपर ही भाषा तो जाणत नाहीं. कमल उमललें म्हणजे त्यांत ज्याप्रमाणें मुकुलितपणा झांकलेलें असें कांहींच राहत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या अंतःकरणांत गुप्त किंवा खाजगी असें कांहींच नसतें. अमृताच्या क्षरेप्रमाणें त्याचें अंतःकरण सरळ असतें. किंबहुना तो या सर्वांचें माहेरघरच असतो."


## आचार्योपासन

गुरुसेवा या सद्गुणानें श्रीज्ञानेश्वरांचें लक्ष विशेषच वेधिलें असून त्याचें वर्णन अतिसूक्ष्मपणें करण्यांत त्यांनीं यत्किंचित्‌हि कसूर केलेली नाहीं. " सर्व जलसमृद्धि घेऊन गंगा समुद्रास मिळते किंवा अनुभूति ज्याप्रमाणें शेवटीं ईश्वराच्या नामांत प्रविष्ट होते, त्याप्रमाणें ज्यानें आपलें अंतर्बाह्य सर्व जीवित गुरूस अर्पिलें व जो आपण भक्तीचें घर बनून राहिला, तोच खरा गुरुभक्त होय. विरहिणी पतिव्रतेस ज्याप्रमाणें आपल्या वल्लभाचा ध्यास लागतो, त्याप्रमाणें फक्त गुरुगृह ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणींच त्याचें मन रमतें. हें माझें संकट केव्हां नष्ट होईल व माझे स्वामी गुरुदेव मला केव्हां भेटतील असें तो सारखें विचारीत राहतो व त्यास एकेक क्षण युगापेक्षांहि मोठा वाटतो. गुरुग्रामाहून कोणी आला किंवा त्यांनीं स्वतः कोणास त्याच्याकडे पाठविलें तर मृत मनुष्यास पुनः आयुष्य मिळाल्याइतका त्याला आनंद होतो. दरिद्री माणसानें अलोट संपत्ति पाहावी किंवा आंधळ्याला दृष्टि मिळावी किंवा भिकाऱ्याला इंद्रपद प्राप्त व्हावें, त्याप्रमाणें त्यास गुरुकुळींच्या नांवानेंहि अत्यंत थोर सुख होतें." अंतःकरणांत तो श्रीगुरुमूर्तीचें अत्यंत प्रेमळपणें ध्यान करतो. आपल्या शुद्ध हृदयाच्या आवारांत, आराध्य-चैतन्याच्या पोकळींत गुरुदेवांस तो ध्रुव ताऱ्याप्रमाणें स्थिरपणें बसवितो. परमानंदाच्या देवळांत श्रीगुरुलिंगावर तो ध्यानामृताचा अभिषेक करतो. बोधाचा सूर्य उगवल्यावर सद्भावांची अनंत सुंदर फुलें आपल्या बुद्धिरूपी परडींत भरून तो श्रीगुरुमूर्तीस ती लक्ष लक्ष वाहतो. रोज तीनहि पवित्र काळीं तो जीवरूप धूप जाळतो व ज्ञानदीपानें श्रीगुरूस निरंतर ओंवाळतो. किंबहुना श्रीगुरूस देव करून आपण त्याचा पुजारी होतो." किंवा एखादे वेळीं तो गुरूस आपल्या भावबळानें आई मानून व तिच्यापासून मिळालेलें नामामृत पिऊन गुरुमाउलीच्या मांडीवर आनंदानें लोळतो. किंवा चैतन्यवृक्षाखालीं गुरु ही कामधेनू असून, आपण तिचें वासरूं आहों असें तो मानतो. एखादे वेळीं गुरुकृपेच्या व गुरु-

प्रेमाच्या पाण्यांत स्वच्छंदानें पोहणारी मासोळी आपण आहों अशी कल्पना तो करतो. आपण एका सेवावृत्तीचें लहान रोपटें असून गुरुकृपामृताच्या पाण्यानें वाढत आहों असा संकल्प तो मनांत आणतो किंवा आपण पंख व चोंच नसलेलें पिल्लूं बनून व गुरूस पक्षिणी मानून तिच्या चोंचींतून तो चारा घेतो." गुरूचें दास्य करण्याची शिष्यास इतकी मोठी हौस असावी कीं त्याचें कौतुक वाटून श्रीगुरूंनीं प्रसन्न होऊन त्याला तो वर मागण्यास सांगावें व त्यानेंहि लगेच "देवा, मला स्वतःच तुझा सर्व परिवार व उपकरणीं होऊन सर्व तऱ्हेनें तुझी सेवा करूं दे" अशी विनंति करावी! देह आहे तोंपर्यंत याप्रमाणें सेवा करावी व देहाचा अंत झाल्यावरहि अशी बुद्धि बाळगावी कीं, "माझ्या श्रीगुरूंचे चरण जेथें उभे असतील त्या ठिकाणीं माझ्या शरिराची माती मिळवीन. माझा स्वामी कौतुकानें ज्या पाण्यास स्पर्श करीत असेल, तेथें माझ्या शरिरांतील पाण्याच्या अंशाचा लय करीन. त्याच्याभोंवतीं ओंवाळल्या जाणाऱ्या व उजळणाऱ्या दिव्यांत माझी दीप्ति मिसळून टाकीन. माझ्या प्राणांचें श्रीगुरूची सेवा करणाऱ्या पंख्यांत व चवरीमध्यें मी रूपांतर करीन. माझ्या हृदयांतील आकाश, माझे स्वामी आपल्या परिवारासह ज्या आकाशांत असतील त्या आकाशांत मिळवून टाकीन. तो गुरुदास्यानें कृश व गुरुप्रेमानें पुष्ट होतो व स्वतः गुरु-आज्ञेचें एकमेव स्थान बनतो. तो गुरूच्या उच्च कुळामुळें आपणास सत्कुलीन व गुरुबंधूंच्या थोर कृत्यांमुळें आपणास सज्जन मानतो. गुरूची सतत सेवा हेंच त्याचें व्यसन. गुरुसंप्रदायाचे नियम हेच त्याचे वर्णाश्रमधर्म. गुरुच त्याचें क्षेत्र, गुरूच त्याची देवता, गुरूच माता व पिता. गुरूनें दिलेला मंत्रच त्याच्या मुखांतून येतो. गुरुवाक्य नाहीं असें पुस्तक तो हातींहि धरीत नाहीं. गुरुचरणाचा स्पर्श झालेलें पाणी कसेंहि असलें तरी तें त्रैलोक्यांतील सर्व तीर्थांपेक्षां त्यास श्रेष्ठ वाटतें. अकस्मात् गुरूचें उच्छिष्ट त्यास लाभलें, तर त्यापुढें समाधि-सुखहि त्यास तुच्छ वाटतें! कैवल्य-सुख आपणास मिळावें म्हणून गुरु चालत असतां त्यांच्या पायधुळीचे परमाणू तो आपल्या शिरावर उधळतो. त्याच्या गुरुभक्तीला सीमाच नाहीं. तो आत्मज्ञानाचें निधान होऊन राहातो व त्याच्यामुळें ज्ञानास शोभा येते. वस्तुतः तो देव बनतो व ज्ञान त्याचा भक्त बनतें. "वर वर्णन केलेली गुरुसेवा आपल्याहि हातून घडावी अशी माझ्या जीवाचीहि तीव्र इच्छा असल्यामुळें विषयांतर करून मीं येवढा विस्तार केला" असें श्रीज्ञानेश्वर म्हणतात. "मी लुळापांगळा न झाल्यामुळें भजन करण्यास असमर्थ नाहीं, हें माझें केवढें भाग्य! मी आंधळा किंवा लंगडा किंवा मुका नाहीं हें माझें सुदैव होय. मी आळशी नाहीं हेंहि भाग्यच होय. नाहींतर गुरुसेवेशिवाय मी व्यर्थंच पोसला गेलों असतों. माझ्या अंतःकरणांत गुरुविषयीं खरें प्रेम आहे हेंहि भाग्याचें होय. या कारणांसाठींच व गुरूची पारमार्थिक सेवा घडावी म्हणूनच मी आपलें शरीर पोषीत आहे," असं श्रीज्ञानेश्वर म्हणतात.

## शुचित्व

यानंतर पावित्र्य या सद्‌गुणाचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं दिलें आहे : कापुराप्रमाणें अंतर्बाह्य निर्मळ चकचकीत असणें किंवा रत्नाचें स्वरूप जसें आंतबाहेर सारखेंच शुद्ध असतें, तसें असणें म्हणजे शुचित्व होय. पवित्र मनुष्य सूर्याप्रमाणें अंतर्बाह्य शुद्ध असतो. तो पवित्र आचरणानें शरीर शुद्ध ठेवतो व आंतून ज्ञानानें उजळलेला असतो. याप्रमाणें दोनहि प्रकारें तो शुद्ध असतो. अंतरीं शुद्ध नसतां बाहेर चांगलीं कर्में करणें म्हणजे मृताला शृंगारणें किंवा गाढवाला तीर्थस्नान घालणें किंवा कडू दुध्यास वरून गुळानें माखणें म्हणजेच खऱ्या शुचित्वाची विटंबना होय. ओस पडलेल्या घरीं तोरण बांधण्याप्रमाणें किंवा उपाशी असलेल्याचें शरीर अन्नानें लिपण्याप्रमाणें किंवा विधवेनें आपल्या कपाळावर कुंकूं लावल्याप्रमाणें हें निरर्थक आहे. मुलाम्याचा कळस बाहेरून कितीहि झळाळत असला तरी आंतून पोकळच असतो. मग तो वरील झगझगाट काय जाळावयाचा ? ज्याच्या आंत शेण आहे असें बाहेरून रंगविलेलें चित्र घेऊन काय करावयाचें ? नुसतें वरपांगीं चांगलीं कर्में केल्यानें खरें शुचित्व कसें येईल ? मदिरेचा घडा गंगेच्या पाण्यांत बुडविल्यानें पवित्र होईल काय ? म्हणून अंतरीं ज्ञान व्हावें म्हणजे बाह्य चांगलें प्राप्त होतें. बाह्यभाग कर्मांनें चांगला धुतला व अंतरींचा कलंक ज्ञानानें पुसला, तरच अंतर्बाह्य शुद्ध होऊन तो मूर्तिमंत शुचित्व बनतो व त्याच्या अंतःकरणांतील शुद्ध भाव स्फटिकगृहांतील दीपाप्रमाणें स्पष्टपणें बाहेर फांकतात. असा मनुष्य बाह्यतः इंद्रिय-विषयांनीं मळला वा विषयांवर लोळला तरीहि विकाराच्या विटाळानें तो मलिन होत नाहीं. एखाद्या मनुष्यास वाटेवर अकस्मात् महार भेटले तरी त्यामुळें तो स्वतः कांहीं विटाळत नाहीं; किंवा एकच स्त्री पतीस व पुत्रास आलिंगीत असली, तरी पुत्रास आलिंगितांना तिला कामवासना शिवत नाहीं; पाण्यांत हिरा भिजत नाहीं, आधणांत वाळू शिजत नाहीं; त्याप्रमाणेंच विकल्पसमूहानें त्याचें मन विटाळत नाहीं, याचेंच नांव पूर्ण पावित्र्य व तें जेथें असतें तेथेंच ज्ञान वसतें.



# देव तारी त्यास कोण मारी

**********************************

अनुवादक : **पी. बी. के.**

पुढील घटना प्रत्यक्ष घडलेली आहे. वाचकांनीं ती वाचून त्यापासून योग्य तो बोध घ्यावा.

किती तरी दिवसांपासून रजा घेऊन कुठें तरी दूर जाऊन राहीन असें वाटत होतें; परंतु तें साधत नव्हतें. शेवटीं गेल्या मे महिन्यांत तो योग आला एकदांचा कसाबसा जुळून ! मी एक महिन्याची रजा घेऊन पत्नीसह हरद्वार, डेहराडून व मसुरी या भागांची सफर केली.

आम्हीं प्रथमतः हरद्वारला गेलों व तेथें सुमारें पंधरा दिवस मोठ्या मजेंत घालविले. तेथें असतां रोज सायंकाळीं आम्हीं ब्रह्मघाटावर जाऊन संध्या आरतींत भाग घेत असूं. ब्रह्मघाटाला ' हरी की पायरी ' असेंही म्हणतात. संध्या आरतींत भाग घेणें आम्हांला फार सुखावह वाटत असे. गंगामाता म्हणजे लोकमाता. ती सर्वांचें रक्षण करणारी—सर्वांना जीवन देणारी.

ता. १७ मे हा दिवस आमच्या दृष्टीनें महत्त्वाचा. आमच्या लग्नाचा एकूणचाळीसावा वाढदिवस. त्यानंतर दोन दिवसांनी आम्हीं डेहराडूनला जाणार होतों. त्यामुळें त्या दिवसांची संध्याकाळ आम्हीं बाजारांत जाऊन तेथें मिळणाऱ्या वस्तू खरेदी करण्यांत घालविली. त्यासाठीं हरद्वारमधील मोठें दुकान निवडलें होतें. खरेदी संपेपर्यंत पावणे नऊ वाजले. ( रात्रींचे ) आणि नंतर गेले पंधरा दिवस जसे आम्हीं नदीतीरावर जाऊन विश्रांति घेत असूं त्याप्रमाणें कांहीं वेळ बसून विश्रांति घेण्याचें ठरविलें.

ती काळोखी रात्र होती. आम्हीं स्वस्थ बसण्यासाठीं निवडलेली जागा हर की पायरीपासून थोडी दूर होती. तेथून गंगा शताब्धि पूल सुमारें पंचवीस फुटांवर होता. त्याचें उद्‌घाटन १९६२ सालीं पंडित नेहरू यांच्या हस्तें झालें होतें. आम्ही बसलों त्या भागांत प्रकाश फारसा नव्हता. त्यावेळीं तेथें लोकांची गर्दीहि मुळींच नव्हती. कांहीं साधू—संन्यासी इकडे तिकडे दिसत होते.

" मी गंगाजळाचं जरासं आचमन करूं कां ? करावेंसें वाटतें मला ! " माझी पत्नी माझ्याकडे पहात म्हणाली.

मी मानेनेंच होकार दर्शविला. तिनें काळोखांत पायऱ्या उतरून खालीं जाण्यासाठीं एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर पावलें ठेवलीं मात्र, तोंच गडगडत ती एकदम खालीं गेली व पाण्याच्या प्रवाहांत जाऊन पडली! पाण्याचा वेग बराच होता. त्या वेगाबरोबर ती पुढें पुढें खेंचली जाऊं लागली. हरद्वार येथें गंगेच्या पाण्याला जबरदस्त वेग असतो. माझ्या पत्नीनें पाय सावरून उभें राहण्याचा प्रयत्न कसोशीनें केला. ते प्रयत्न चालू होते; परंतु पाण्याला वेग फार असल्यामुळें तिला पायांवर उभे रहातां येईना! अशा स्थितींत ती पाण्याच्या प्रवाहाबरोबर वहात जाऊं लागली.

आपण तिच्या मागोमाग पाण्यांत उडी मारून तिला पकडींत धरावें, असा विचार मनांत आला; परंतु तो येऊन कांहीं उपयोग नव्हता. कारण मला मुळींच पोहतां येत नव्हतें. मदतीसाठीं ओरड करणें एवढेंच माझ्या हातांत होतें. तें मी कसोशीनें केलें. माझ्या वांट्याला आलेला तो एक दारुण अनुभव होता. मी हताश व हतबल झालों होतों. प्रसंग मोठा दुर्धर होता. आणि अशा वेळीं मी कांहीं करूं शकत नव्हतों. गंगेच्या प्रवाहांत माझी जिवलग पत्नी वाहत चालली होती.

आणि इतक्यांत अचानक आश्चर्यकारक अशी एक घटना घडून आली.

कोणी तरी त्या वहात्या पाण्यांत धाडकन् उडी मारली व पुलाकडें झपाट्यानें वहात जाणाऱ्या माझ्या पत्नीला अडविलें! तिला घेऊन आस्ते आस्ते तो तरुण किनाऱ्यावर येऊन थडकला.

किती हायसें वाटलें आहे मला त्याक्षणीं! मी एक दीर्घ श्वास सोडला. मी भानावर नव्हतों. माझ्या पत्नीची आश्चर्यकारक रीतीनें एका जीवघेण्या प्रसंगांतून


**ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स**

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २.**

**टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण.**

**होलसेल व रीटेलर्स**

ईश्वरकृपेनें सुटका झाली होती. आणि तीहि अलौकिक रीतीनें. ओळखदेख कांहीं नसलेल्या एका अज्ञात व्यक्तीकडून !

आणखी दोन मिनिटें लोटलीं असती तर माझी पत्नी हातची गेली असती ! पुलाखालीं पाण्याचा जोर जबरदस्त होता. तेथें पोहोंचायला दोनच मिनिटांचा अवधि होता. इतक्यांत एका अज्ञात माणसानें पाण्यांत उडी मारून तिला बचावलें होतें ! किती आश्चर्यकारक घटना होती ती ! मला नंतर कळलें कीं, दुसऱ्याच दिवशीं दोन शाळकरी मुलें त्या जागीं बुडून ठार झालीं !

आणि केवढें आश्चर्य ! ज्या अज्ञात व्यक्तीनें माझ्या पत्नीची त्या दुर्दैवी प्रसंगांतून सुटका केली ती व्यक्ति माझ्या पत्नीला किनाऱ्यावर सोडून क्षणार्धांत नाहींशी झाली !

माझ्या आरडाओरडीमुळें त्यावेळीं त्या किनाऱ्यावर लोकसमुदाय बराच जमा झालेला होता. त्या गर्दींत ती व्यक्ति कुठें गेली समजलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं आम्हीं अपघात घडलेली जागा पहाण्याच्या हेतूनें गेलों. सूर्यास्त होण्याची वेळ होती. माझ्या पत्नीनें ज्या पायरीवर पाऊल टाकलें ती पायरी तुटलेली होती. दुर्दैवी घटना !

आम्हीं तेथें गेलों तेव्हां कांहीं साधूसंन्यासी आमच्याजवळ आले व काल पाण्यांत पडून वहात जाणारी बाई ती हीच हें त्यांनीं अचूक ओळखलें.

तिला वांचविणारी अज्ञात व्यक्ति कोण याबद्दल त्यांच्याजवळ मी चौकशी केली. त्यांना ती व्यक्ती माहीत होती. तेथून जवळच पंधरा वर्षांचा एका मुलगा व्हेपर, चणेफुटाणे, वगैरे एका परातींत घालून ते विकीत होता.

ज्यानें माझ्या पत्नीला ऐन प्रसंगीं वांचविलें व हें माझ्या दृष्टीनें महान् कृत्य करूनही जी व्यक्ति एकदम अदृश्य झाली, तीच ती व्यक्ति होती !

त्या मुलाचें वय असेल सुमारें पंधरा वर्षांचें. केवढी बहादुरी, केवढें शौर्य व त्याचबरोबर केवढा त्याग. त्याला काय आम्हीं वाटेल तें बक्षीस दिलें असतें. परंतु त्याची त्याला मुळींच अपेक्षा नव्हती. कर्तव्याशीं गांठ ! फळाची बिलकूल इच्छा नाहीं. आणि तीही अशा कोवळ्या खेळकर वयांत !

आम्ही उभयतां त्या मुलाजवळ गेलों. मी त्याचे पुन्हां पुन्हां आभार मानले व त्याला शतशः धन्यवाद दिले. तो निर्विकार होता. जसं कांहीं कांहींच घडलं नाहीं. आणि तो प्रसंग तर आमचं जीवन घुसळून सोडणारा होता.

माझ्या पत्नीनें देवाच्या पायां पडावें त्याप्रमाणें त्याला हात जोडले. त्याचं लक्ष कुठं होतं ?

मी त्या मुलास कांहीं रक्कम देऊं लागलों तेव्हां तिला स्पर्शहि न करतां तो म्हणाला, "छे ! छे ! मी पैसे घेणार नाहीं." त्यांत काय घडलं माझ्याकडून ? मी माझं पवित्र कर्तव्य केलं. माझी माता किंवा बहीण पाण्यांत पडली असती तर तिच्यासाठीं मी उडी मारली नसती का ?

काय हा त्याग ? आणि केवढी जाज्वल्य कर्तव्यनिष्ठा !

हरद्वारहून आमचे पाय हालेनात. आमचा मुक्काम आम्हीं दोन दिवसांनीं वाढविला.

त्या मुलासंबंधीं अधीक चौकशी करायची होती. चौकशी अंतीं समजलें कीं, त्या मुलाचें नांव नंदकिशोर. वय पंधरा. तो तेथील शाळेंत जाऊन शिक्षण घेतो. इयत्ता आठवी. त्याचे आईवडील फार गरीब. शिकण्याची दांडगी हौस. खर्च भागला पाहिजे म्हणून व्हेफर वगैरे खाद्य पदार्थ विकून रोज दीडदोन रुपये कमाई करतो. स्वावलंबी जीवन सकाळ—संध्याकाळ हा त्याचा नित्यक्रम.

अशा या त्यागी व धाडसी मुलाबद्दल कांहीं तरी करावें ही मनांतील दारुण इच्छा. परंतु केलेल्या उपकाराची फेड करूं द्यायची नाहीं ही त्याची तीव्र भावना. या मुलाचे जितके गोडवे गावे तेवढे थोडेच होतील. त्याच्या निःस्वार्थ वागणुकीपासून थोरामोठ्यांनींही बोध घ्यावा. आमच्यासाठीं त्यानें स्वतःचें जीवित धोक्यांत घातलें. पुन्हां केवढी त्याची नम्रता व सदयता. त्याच्या पुढील शिक्षणाची शक्य ती सोय करावी अशी आमची इच्छा होती. आमच्याकडून कोणत्याही स्वरूपांत कांहीं न घेण्याचें त्यानें नम्रतापूर्वक नाकारलें. त्याचें विस्मरण आम्हांला कधींही होणार नाहीं. देव त्याचें भलेंच करील. तो जगांत नांव काढील. हरिद्वार सोडतांना आम्हीं त्याचा निरोप घेतला तेव्हां आमच्या डोळ्यांत पाणी तरारलें. नंदकिशोरचेही डोळे पाणावले होते.

— भवान्स जर्नलमध्यें ( जून १९६६ ) श्री. एस. जी. तोलात. यांनीं लिहिलेल्या इंग्रजी लेखाचा हा स्वैर अनुवाद.

———

# भेसळीचें महापाप

आजकाल खाण्यापिण्याची कोणतीहि वस्तू असो, ती भेसळीशिवाय मिळूं शकत नाहीं. भेसळ ही आजच्या जमान्यांत सार्वत्रिक होऊन राहिली आहे. दूध असो, तूप असो किंवा लोणी असो ते भेसळीशिवाय शुद्ध स्वरुपांत मिळणें कठीण झालें आहे. गव्हाचें पीठ, मसाले किंवा कोणतीहि खाद्य वस्तू असो त्यांत हलक्या व अपायकारक वस्तूंची भेसळ केलेली असते.

रोग्यांना औषधें द्यावी लागतात तींसुद्धां शुद्ध स्वरुपांत मिळणें आजकाल महाकठीण झालें आहे.

लहानमोठ्या व्यापाऱ्यांस भेसळ करून वस्तूची विक्री करण्यांत पाप आहे, हा ईश्वराच्या दरबारीं मोठा गुन्हा आहे असें बिलकूल वाटेनासें झालें आहे. अधिक पैसे मिळविण्याचा लोभ अनिवार वाढत चालला आहे. वस्तू विकत घेणाऱ्याचें कांहीं का होईना. आपणास पैसा जास्तींत जास्त मिळाला म्हणजे झालें. अशा प्रकारची बेपर्वाई वृत्ति सध्यां सर्वत्र बोकाळली आहे.

भेसळीचे पदार्थ पोटांत गेल्यानें प्रकृतीची, शरीराची अपरंपार हानी होते. परंतु कोणी कोणाची पर्वा करायची ?

धर्मभावना, पुण्यभावना लोपत चालली आहे. खोटें असत्य कृत्य करून खऱ्याचा आभास निर्माण करावयाचा व गिऱ्हाईकांची फसवणूक करायची हें मोठें पाप आहे याची जाणीवच नाहींशी झाली आहे. शपथेवर सांगण्याची तयारी.

माणसाच्या स्वार्थाला, लोभाला कांहीं ना कांहीं सीमा असावी लागते. तें सीमेचें बंधन तुटत चाललें आहे.

यावरून काय समजायचें ? समाजाची नैतिक पातळी अत्यंत खालावत चालली आहे. नीतीची व धर्माची कोणाला चाड राहिलेली नाहीं. स्वार्थ सर्वत्र बोकाळला आहे.

अशा या लोकांना ठिकाणावर आणायचें कोणी हा एक बिकट प्रश्न आहे. भेसळीच्या या प्रश्नाबद्दल जितकें लिहावें तितकें थोडेंच होईल. हा प्रश्न आज गंभीर स्वरूप धारण करून राहिला आहे. याला आळा घालायचा कसा ?

अशा लोकांना सरकारनें पकडून जास्तींत जास्त कडक शिक्षा ठोठावली पाहिजे. ही जनतेच्या प्राणाशीं गांठ आहे.

माणसाची देव, धर्म व नीतिमत्ता यांच्यावर श्रद्धा पाहिजे. ती श्रद्धा जेथें आहे, तेथें भेसळीचें पाप संभवत नाहीं. परंतु ती श्रद्धाच जेथें नाहींशी झाली आहे तेथें तुम्ही काय करणार ?

सर्व धर्मांनीं भेसळ केलेला माल किंवा कोणतीहि वस्तू विकणें हें महापाप असल्याचें सांगितलें आहे. परंतु जेथें धर्माला, न्यायनीतीला जुमानायचें नाहीं, अशी प्रवृत्ति बोकाळलेली तेथें कोण काय करणार ?

भेसळ करणें म्हणजे चोरी करणें, लबाडी करणें व दुसऱ्याची फसवणूक करणें, आणि जो दुसऱ्याला अशा रीतीनें फसवितो त्याच्या वाऱ्यालाहि देव उभा रहाणार नाहीं !

आजकाल आमची किती अधोगती झाली आहे, देवधर्माला आम्ही किती पारखे झालेले आहोंत हें यावरून दिसत आहे.

यावर रामबाण उपाय म्हणजे भेसळीचें पाप करणाऱ्याला पकडून त्याला देहदंडाची, फटक्यांची शिक्षा ठोठावणें हाच उपाय दिसतो. धार्मिक शिक्षणाची बालपणापासून जरुरी आहे ती यासाठींच. धर्मभावना लोपली म्हणजे अधर्माचें राज्य सुरू होते. तसाच शोचनीय प्रकार सध्यां घडत आहे.

हिंदु, मुस्लीम, पारशी व खिस्ती या सर्व धर्मांत भेसळ करूं नका व ईश्वराच्या अवकृपेला पात्र होऊं नका असें सांगण्यांत आलें आहे; परंतु तें कोण लक्षांत घेत आहे ? आज प्रत्येकजण स्वार्थांध बनलेला आहे. देवाला कधीं दया येते पाहूं या.

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

**छबिलदास रोड, दादर (W. R.),**

# सत्यप्रेमानें देवाची भेट

देवाचें दर्शन घडणें ही साधी का गोष्ट आहे ? वाटेल त्याला देवदर्शन घडत नाहीं, त्यासाठीं भारी किंमत द्यावी लागत असते याची यथायोग्य कल्पना फारच थोड्यांना असते. भगवद्दर्शन वाटेवर पडलेलें नाहीं.

त्यासाठीं काय करावें लागतें ? सत्य प्रेम या एका शब्दांत कितीतरी अर्थ भरलेला आहे. एका कवीनें म्हटलें आहे कीं, 'सत्यप्रेमचि दाउनि सुजनें तो विश्वपाळ कवळावा.' परमेश्वर सत्यप्रेम आढळतांच धांव घेत तुमच्याकडे येतो.

वरपांगीं प्रेमाला देव वश होत नाहीं. खरेंखुरें, अंतःकरणापासून केलें गेलेलें प्रेम त्याला हवें असतें. तशा प्रेमाचा तो भुकेला आहे.

सत्यप्रेम म्हणजे कोणत्या प्रकारचें ? ध्रुवबाळासारखें; प्रल्हादासारखें, लक्ष्मणासारखें; हनुमंतासारखें.

ध्रुवाच्या मार्गांत अडचणी आणि संकटें थोडीं का आलीं ? परंतु प्रत्येकवेळीं ध्रुव अचल राहिला, आणि प्रल्हाद ? प्रल्हादानें कोणत्याहि संकटाला जुमानलें नाहीं. लक्ष्मणानें सर्व सुखावर लाथ मारली. राजवैभवाची त्यानें पर्वा केली नाहीं. पत्नीचाहि यत्किंचित् लोभ धरला नाहीं. त्यानें श्रीरामचंद्राबरोबर सरळ वनवासाचा मार्ग स्वीकारला.

हनुमानाची श्रीरामचंद्रावर किती अढळ श्रद्धा होती ? आणि भरत ? त्यानें कशाचाहि लोभ बाळगला नाहीं. त्याचें उदाहरण किती उज्ज्वल आहे ?

मान, अपमान, प्रतिष्ठा, सुखोपभोग या सर्वांवर लाथ मारून आपला मार्ग चोखाळावा लागतो. पाहिजे अचल श्रद्धा व अढळ निष्ठा.

आजकाल पहावें तों आम्हांला त्रास घ्यायला नको. देवदर्शन सुखासीनाला घडूं शकत नाहीं. तो मार्ग कांटेरी व खडकाळ आहे. त्या मार्गानें जाण्याची आपली तयारी पाहिजे.

तुकाराम, नरसी मेहता यासारख्या साधुसंतांना देवदर्शन घडलें तें सहजासहजीं घडलें नाहीं. त्यांनीं त्यासाठीं सर्वस्व अर्पण केलें. त्यांनीं भगवंतावर मनापासून प्रेम केलें. तेव्हांच त्यांना त्या सत्यप्रेमाचा मोबदला योग्य वेळीं मिळाला.

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल, शिर्डी

[ मागील अंकावरून पुढें चालू ]

**शिर्डी ऑफिसांत जमा (रोखीने) दि. १-५-६५ ते ३०-१-६६ या काळांत जमा झालेल्या देणग्यांची साभार पोंच.**

| | | रु. पै. |
|---|---|---|
| डॉ. डी. एम. सुरती | अहमदाबाद | ५० |
| श्री. वामन श्रीपाद | मुंबई | ५० |
| ,, मोहनलाल कापडिया | ,, | ५० |
| ,, धोंडीराम | पारगांव | ५० |
| ,, आर. व्ही. साठे | मुंबई | ५० |
| ,, बी. वेंकटराम | मद्रास | ५० |
| श्रीमती लक्ष्मीबाई वालावलकर | पुणे | ५० |
| सौ. स्वाति गडकर | बेळगांव | ५० |
| श्री. के. डी. बोराटकर | मुंबई | ५० |
| ,, भूपेंद्र परीख | ,, | ५० |
| ,, प्रतापराय | मुंबई | ५० |
| श्री. व सौ. वामन नारायण | ,, | ३० |
| श्री. गणपतराव | ,, | २६ |
| सौ. सखुबाई | ठाणें | २५-२५ |
| श्री. मु. रु. पाटील | प. बंगाल | २५ |
| सौ. कमलाई सदानंद | न. दिल्ली | २५ |
| बाई लढूबाई नायक | वापी | २५ |
| श्री. आर. के. दवे | मुंबई | २५ |
| ,, मधुकर सत्यवंत | ,, | २५-२५ |
| ,, एन. टी. शिरसोलकर | ,, | २५ |
| ,, के. जी. नरीमन | ,, | २५ |
| डॉ. व्ही. एस. केळकर | सांगोला | २५ |
| श्री. व्ही. जे. बक्षी | मुंबई | २५ |
| ,, आर. के. दवे | ,, | २५ |
| ,, रवी नरीमन | ,, | २५ |
| ,, हातीमभाई लोखंडवाला | कुर्ला | २१-२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोतीराम राणे | पुणें | | २१ |
| श्रीमती पुष्पा शहा | मुंबई | | २१ |
| डॉ. के. ए. शहा | ,, | | २१ |
| चत्रुमल फॅमिली | ,, | | २१ |
| श्री. एम्. जी. सोहोनी | ,, | | २१ |
| श्री. गंगाराम कल्याणजी | मुंबई | | २० |
| ,, बी. के. बॅनर्जी | ,, | | १७–५० |
| मिसेस डी. एन्. दस्तूर | सिकंदराबाद | | १५ |
| श्री. एम्. एल. जगन्नाथ | मुंबई | | १५ |
| ,, बी. एम्. डोंगरे | दादर | | १३ |
| ,, एस. एम्. आचार्य | औरंगाबाद | | ११ |
| मिसेस के. रेळे | मुंबई | | ११ |
| श्री. भीमसेन | ,, | | ११ |
| ,, बी. पी. ठक्कर | ,, | | ११ |
| मि. मिसेस होर्मिंगोळवाला | ,, | | ११ |
| श्री. के. एम्. दारूवाला | ,, | | ११ |
| ,, एस. एस. ढोंगरे | ,, | | ११ |
| डॉ. मधोलकर भट | ,, | | ११ |
| श्री. एस. एम. आपटे | ,, | | ११ |
| सुप्रजा | ,, | | ११ |
| श्रीमती ज्योतीबाई कानडे | ,, | | ११ |
| श्री. एन. के. संघवी | मद्रास | | ११ |
| ,, व्ही. पी. करोडिया | मुंबई | | ११ |
| ,, बी. व्ही. ठक्कर | ,, | | ११ |
| ,, बी. टी. रावनी | ,, | | ११ |
| ,, नारायण | ,, | | ११ |
| डॉ. शाम दस्तुर | ,, | | ११ |
| श्री. जेठालाल वेलजी | ,, | | ११ |
| ,, ए. एम. कुलेंकर | ,, | | ११ |
| ,, मुकुंद शहा | ,, | | १२ |
| चि. संजय ल. कुंभार | शिर्डी धुळें | १०+१०·२५ | २०·२५ |
| सौ. ललिता | मुंबई | | १० |

| | | |
|---|---|---|
| श्री. माधव भट | मुंबई | १० |
| ,, मधुसूदन भट | ,, | १० |
| श्रीमती प्रवीण बेन | भडोच | १० |
| श्री. परमेश्वर | मुंबई | १० |
| श्री. जव्हेरी | मुंबई | १० |
| श्री. हिम्मतलाल शहा | धुळे | १० |
| ,, नरेंद्र महिपती | मुंबई | १० |
| डॉ. बी. के. बानर्जी | ,, | १० |
| सौ. पद्मावती पारख | ,, | ७–२५ |
| मी. व मिसेस होर्मी | ,, | ७ |
| श्री. केशव आचार्य | ,, | ६ |
| ,, देशमुख ब्रदर्स | ,, | ५–२५ |
| ,, बेहराम जे. | ,, | ७ |
| श्री. आर. एस. संघवी | मुंबई | ५–२५ |
| श्रीमती लभूबेन मेहता | ,, | ५–२५ |
| श्री. एस. के. संघवी | ,, | ५–२५ |
| ,, आर. एन्. मेहता | ,, | ५–२५ |
| श्रीमती सुलोचना केशरीनाथ | ,, | ५ |
| श्री. ए. बी. पाटील | कोल्हापूर | ५ |
| ,, जे. एस. बागवे | मसुरे | ५ |
| श्रीमती सुंदराबाई भट | मुंबई | ५ |
| ,, तरुलता पिंगळे | इंदोर | ५ |
| श्री. नारायण पराशर | ,, | ५ |
| सौ. सरस्वती शेट्टी | मुंबई | ५ |
| ,, अहिल्या ढोबळे | ,, | ५ |
| डॉ. एम्. एन्. पाबळे | ,, | ५ |
| श्री. शंकरदास | ,, | ५ |
| ,, पी. बी. मेहता | पुणे | ५ |
| श्रीमती मणीबेन | मुंबई | ५ |
| डॉ. डी. एन्. दस्तूर | सिकंदराबाद | ५ |
| श्रीमती दिना के. पंथकी | मुंबई | ५ |
| ,, तुळसी परशराम | ,, | ५ |
| मिसेस ए. के. के. नंबीआर | हैद्राबाद | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मदुरे | मुंबई | | ५ |
| ,, आर जे. परदेशी | पुणें | | ५ |
| श्री. बी. कौरा | मुंबई | | ५ |
| डॉ. डी. एस. शहा | ,, | | ५ |
| श्रीमती लक्ष्मी | ,, | | ५ |
| ,, लक्ष्मी अयआर | ,, | | ५ |

मनी ऑर्डरने आलेली ( शिरडी ) पुढें चालू

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. आर. एस. वासन | मद्रास | | ५० |
| ,, एस. के. जोशीराव | अलाहबाद | | ५० |
| ,, कृष्ण होजारीमल | धुळें | | ४७–५० |
| मेजर एस. पी. नातू ( एकंदर ) | अलाहबाद | | ११३ |
| श्री. के. ई. मेहता ( २५+२५ ) | इंदौर | | ५० |
| ,, टी. जी. पाटील | नांदेड | | ५० |
| ,, शं. डी. कारेकर | मुबई | | २० |
| ,, हिरालाल जी. शहा | ,, | | ४० |
| ,, मोहनलाल बोटानी | साबरमती | | २० |
| ,, ए. के. मघन | सामलकोट | | २० |
| कु. क्रांती नातू | अलाहाबाद | ११ + ९ = | २० |
| श्रीसाईबाबा मंडळ | रायपूर | | १६ |
| श्रीराम | इंदोर | | ३९ |
| श्री. अरविंद पाटील | कोल्हापूर | | ११ |
| ,, सी. पी. मेहता | पुणें | १०+१० = | २० |
| ,, पी. पी. डेबरा | सिकंदराबाद | | १० |
| ,, बी. व्ही. कर्णिक | डमडम | | ११ |
| ,, बी. आर. बर्मन | अलाहबाद | | १० |
| ,, के. आनंदराव | धारवाड | | १० |
| ,, डी. एस. मेहता | पुणें | | १० |
| ,, बी. व्ही. वर्मा | रेवा | | १० |
| सौ. एस. विश्वनाथ | मुंबई | | १० |
| श्री. ए. एच. धर्माधिकारी | बालाघाट | | १० |
| ,, पी. पी. देहरा | सिकंदराबाद | | १० |
| ,, एम्. एम्. कुळकर्णी | गोकाक | | १० |

| | | |
|---|---|---|
| श्री. के. सुंदरसेन | मुंबई | १० |
| सौ. ललिता आयर | ,, | १० |
| श्री. बी. के. केळकर | मुंबई | १० |
| ,, ए. बी. पाटिल | कोल्हापूर | ८ |
| ,, व्ही. पी. नातू | अलाहबाद | ७ |
| ,, के. डब्ल्यू डोके | मद्रास | १० |
| श्री. रामचंद्र | इंदौर | १७ |
| ,, पी. डी. केळकर | मुंबई | ५ |
| कु. क्रांती नातू | डेहराडून | ५ |
| ,, शांतादेवी मल्लीमठ | बंगलोर | ५ |
| ,, जी. एस. गोइरंग | मुंबई | ५ |
| डॉ. आर. एस. खांडेकर | मुर्तीजापूर | ५ |
| श्री. एस. एम. शेठ | धार | ५ |
| ,, डी. के. केळकर | मुंबई | ५ |
| ,, के. एम. ठाकर | ,, | ५ |
| ,, पी. डी. भालेराव | ,, | ५ |
| ,, फडकर | APO | ५ |
| ,, सुनीलकुमार मालवणकर | सिकंदराबाद | ५ |
| डॉ. आर. एस. खांडेकर | अकोला | ११ |
| श्री. पी. टी. गणवीर नागपूर | नागपूर | ५ |
| ,, एस. एस. मल्लीमठ | बंगलोर | ५ |
| सौ. उषा गाळवणकर | सिकंदराबाद | ५ |
| श्री. एल्. लक्ष्मीशंकर | | ५ |



# वसिष्ठ मुनींचें श्रेष्ठत्व

वसिष्ठ वर्गकलहशून्य अशी उत्कृष्ट समाजव्यवस्था निर्माण करणारे पुरुष आहेत, आणि विश्वामित्र साम्राज्यवादी व्यक्ति आहे. 'मी पराक्रमी आहे.' ( पर + आक्रमी ); दुसऱ्यांवर आक्रमण हा माझा धर्म आहे, असें विश्वामित्र मानीत होता; आणि वसिष्ठ शांतमूर्ति, प्रेमधन आणि तपस्वी होते. त्या दोघांचा झगडा हा व्यक्तिगत झगडा नव्हता, परंतु शासनविचारकांचा झगडा होता—दोन महान् सिद्धांतांचा झगडा होता. वसिष्ठ म्हणतात, "समाजाला विचार, लोकांना—नंदिनीला—तुझ्या राज्यांत यायचें असेल तर खुशाल यावें." वसिष्ठांनीं लोकांना बोलावून सांगितलें कीं, "तुम्ही परचक्रापासून संरक्षण करूं शकाल काय ? माझ्या राज्यपद्धतीच्या मतांचा आग्रह एक क्षणभर जरी दूर ठेवला तरी माझ्याजवळ शस्त्रबळ आणि सैन्यबळ नसल्यामुळें मी तुमचें रक्षण करूं शकणार नाहीं. मी ब्राह्मण आहें. अराज्यवाद—शासनाभाववाद—आणलेला असल्यामुळें माझ्याजवळ शस्त्रबळ आणि सैन्यबळ नाहीं." वसिष्ठांच्या राज्यांत लोक कर्तव्यनिष्ठ होते, त्यामुळें स्वतःचें ध्येय आणि तत्त्व यांसाठीं प्रत्येक मनुष्य लढायला तयार झाला. वाल्मिकी नंदिनीच्या तोंडीं असे शब्द घालतात कीं, 'तस्य दर्पं बलं यत्नं नाशयामि दुरात्मनः ।' त्यांनीं विश्वामित्राच्या भाडोत्री लोकांना मारलें आणि मागें हटवलें. खरोखर ! कर्तव्यपरायण आणि तत्त्वनिष्ठ माणसांपुढें विश्वामित्राच्या भाडोत्री माणसांचें काय चालणार ? ते किती घटका टिकाव धरणार ? त्यांना कापून काढलें आणि नंदिनीनें स्वतःचा प्रभाव दाखविला.

अराज्यवाद आणि साम्राज्यवाद यांसाठीं खेडवळ आणि शहरी यांचा दृष्टांत घेऊंया. खेड्यांतल्या लोकांना लज्जारक्षणापुरती लंगोटी आणि डोक्यावर पगडी असली कीं झालें, दुसरें कांहींहि नको. पणजोबांपासून चालत आलेलें कुडतें किंवा कोट वर्षांनें एक-दोन वेळां बाहेरगांवाला जातांना घालायचे, मध्यंतरींच्या काळांत गांठोड्यांत ठेवून द्यायचे. वसिष्ठांनीं राज्यनियंत्रण राजसत्ता वगैरे गोष्टींचें गांठोडें बांधून एका कोंपऱ्यात ठेविलें होतें. त्यांना दररोजच्या व्यवहारांत त्यांची गरज भासत नव्हती. विश्वामित्राची तयारी शहरी लोकांसारखी होती. 'हॅंगर'वर कोट तयारच आहे. कपाटांत ओळीनें कपडे लावून ठेवलेले आहेत. शहरांतले लोक सुसज्ज आणि तयार असतात. विश्वामित्राचें राज्य सैनिक बळ वगैरे गोष्टींनीं तयार होतें; सैनिक दळ दररोज कवाईत करीत असे; कारण त्यांची मिनिटामिनिटाला गरज होती. असा साम्राज्यवाद होता. नंदिनीनें—लोकांनीं—ज्यावेळीं विश्वामित्राच्या भाडोत्री सैनिकांना मारून विश्वामित्राचा पराभव केला, त्यावेळीं त्याला हें समजलें कीं, "ब्रह्मतेजो बलं बलम् ।" शांतिप्रिय आणि शासनाभाव स्वीकार-

लेल्या प्रजेनें भाडोत्री सैन्याला कापून काढलें. आम्हीं संपादन केलेल्या सामर्थ्याचा धिक्कार असो ! पुन्हां विश्वामित्रानें युद्धाचा प्रयत्न केला, परंतु त्यांतहि त्याचा पराभव झाला. वसिष्ठांनीं त्यानंतर कठोर आत्मनिरीक्षण केलें आणि जीवन असेपर्यंत आत्मसात् केलेल्या सिद्धांतांना तिलांजलि दिली. त्यांनीं स्वतःच्या दिव्यतत्त्वांना स्वतःच मूठमाती दिली. स्वतः लावलेल्या वृक्षाला स्वतःच तोडलें. मरेन पण वांकणार नाहीं असें म्हणणारा परशुराम. वसिष्ठ आवश्यकता पडली तर काळाचा विचार करून नम्र व्हायला तयार झाले. वसिष्ठांना वाटलें कीं, "आपण विजयी तर झालों, परंतु त्यासाठीं फार मोठी किंमत द्यावी लागली आणि समाजाला खूप त्रास झाला. म्हणून शासनाभाववादा-साठीं जोंपर्यंत जग तयार नाहीं तोंपर्यंत कोण केव्हां आपल्यावर हल्ला करील याचा नेम नाहीं. विश्वामित्राच्या सुसज्ज सैन्यापुढें नंदिनीला खूप परिश्रम पडले. जीवन आणि धन यांचा मोठा भाग द्यावा लागला होता. संहारांत खूपच हानि झाली होती. हा शासनाभाववाद यापुढें कायम टिकणार नाहीं; आणि जर असा चालू राहील तर तो अराज्यवाद स्वप्नवत् होईल." त्यांनीं आत्मनिरीक्षण करून पुन्हां विचार करून ठरवून खूपच मोठा अनुपम त्याग केला. तो त्याग शरीराचा नव्हता, तर मतें आणि विचार यांचा त्याग होता.

वसिष्ठांनीं कठोर आत्मनिरीक्षण केल्यानंतर त्याचा त्याग केला. स्वतःच्या मतांचा आणि विचारांचा त्याग सज्जनांना मृत्यूपेक्षांही—शरीरत्यागापेक्षांही—अधिक कठीण वाटत असतो. 'तत्त्वनिष्ठांना'च हें कळेल. 'अनार्किझम्' श्रेष्ठ वाद खरा, परंतु जग जोंपर्यंत मंगलमय होणार नाहीं तोंपर्यंत माझ्या विचारांप्रमाणें शक्य नाहीं, आणि तोंपर्यंत शासनसंस्था हवी. आत्मनिरीक्षण करून त्यांनीं स्वतःचें राज्य त्रिशंकु नांवाच्या सूर्यवंशी राजाला दिलें. क्षत्रिय तेजच नाहींसें झालें होतें, त्यामुळें तो श्रेष्ठ संस्कारी क्षत्रिय नव्हता. शासनाभाववाद श्रेष्ठ विचार खरा, परंतु सुनियंत्रित शासनव्यवस्था त्याची पहिली पायरी आहे. राज्य त्रिशंकूच्या हातांत देऊन स्वतः शासनव्यवस्थेच्या नादांत पडले. नंतर त्या कुळांत हरिश्चंद्र आला. त्यानें विचार केला कीं, "वसिष्ठांचा जुना प्रयोग मी करून पाहातों. मी अराज्यवाद निर्माण करतों." त्यानें राज्यवैभव आणि राज्यव्यवस्था यांवर पाणी सोडलें. तो सामान्य माणसांसारखा राहायला लागला. परंतु शासनाभाव-वाद पुन्हां निष्फळ ठरला. विश्वामित्र तप करण्यासाठीं निघून गेले. क्षत्रियांमध्यें तेज—उच्च विचार निर्माण करण्याची गरज भासूं लागली. वसिष्ठ प्रत्येकाला हें समजावून सांगत होते. त्यामुळें नंतर सुनियंत्रित शासनवाद आला. एकेका राजाला समजावून देऊं लागले. दशरथापर्यंत शासनव्यवस्था उत्कृष्ट करूं शकले नाहींत. दशरथाच्या काळीं पुष्कळसा फेर पडलेला होता, परंतु दशरथाच्या वेळीं सुद्धां अयोध्येच्या बाहेर जनस्थान, पंचवटी आणि लंका या ठिकाणीं तांडवकृत्यें सुरू होतीं—राक्षसी वृत्तीचें थैमान सुरू होतें. विश्वामित्र तप करून परत आले.

वसिष्ठ आणि विश्वामित्र या दोन महर्षींची दृष्टि या कृत्यांकडे गेली. त्या दोघांनीं राजाला खूप सांगितलें. रामलक्ष्मणांना रणनीति, युद्धनीति, राजनीति यांचें शिक्षण कोण देणार ? वसिष्ठ या कार्यासाठीं विश्वामित्राला आमंत्रण देतात. विश्वामित्रानें शिक्षण देण्याचें काम मोठ्या आनंदानें स्वीकारलें. अशा तऱ्हेनें दोन महाशक्तींचा, वसिष्ठ–विश्वामित्रांचा प्रेमळ मिलाप झाला. विश्वामित्र दशरथाजवळ रामाची यज्ञाचें रक्षण करण्यासाठीं मागणी करतो. दशरथ मागेंपुढें करतो. त्यावेळीं वसिष्ठ सांगतात कीं, " राजा ! "

> तषां निग्रहणे शक्तः स्वयं च कुशिकात्मजः ।
> तव पुत्रहितार्थाय त्वां उपेत्याभियाचते ॥ "

या श्लोकावरून राजदरबारांत भेट झाली तत्पूर्वी वसिष्ठ आणि विश्वामित्र यांची खासगी मसलत झाली असली पाहिजे असें वाटतें. त्यामुळें वसिष्ठ, 'तव पुत्रहितार्थाय' असे शब्दप्रयोग करतात. आणि राजाला यज्ञरक्षणासाठीं नव्हे तर " राजपुत्रहितार्थाय " पाठविण्यासाठीं राजाला भाग पाडतात. दोघांनीं असें करण्याचें पूर्वीच निश्चित केलें होतें. दोघांनीं एकत्र बसून सुनियंत्रित, सुसंस्कारी आणि तेजस्वी क्षत्रिय सत्ता स्थापण्याचा प्रयत्न केलेला आहे.

विश्वामित्र रामलक्ष्मणांना घेऊन गेला. रामाला निरपराधी लोकांच्या हाडांचे ढीग दाखवून समजावून दिलें, राक्षसी तांडव नृत्याची कल्पना दिली, आणि क्षत्रिय समाजाची आणि लक्ष्मणाची समाजाला यासाठीं गरज आहे ही गोष्ट त्याच्या मनांत ठसविली. राम-लक्ष्मण यांना संस्कार दिले. परशुराम क्रुद्ध होऊन येतो कीं क्षत्रियाचा मुलगा मी इतकी मेहनत करीत असतांनाहि अजून उभा आहे ? राम परशुरामाला विचारतो कीं, " तुम्ही इथून गेलांत त्यावेळीं लोक कसे होते ? " परशुराम सांगतो, " संपूर्ण राज्य धन, धान्य, पशु, पुत्र यांच्या समृद्धीनें भरलेलें होतें. " राम म्हणतो, " आतां कसें आहे, तें जरा डोळे उघडून पहा बरें ? " रामानें त्याला ठिकठिकाणीं मनुष्यांच्या हाडांचे ढीग दाखविले आणि त्याचा जबाब विचारला. परशुराम निरुत्तर होतो. इथेंच परशुरामाचा पराभव होतो. तो समजला कीं, " रागाच्या आवेशांत क्षत्रिय जातीचा नाश केला त्याचा हा परिणाम आहे. क्षत्रिय जात निस्तेज झाली म्हणून धनधान्याऐवजीं हाडांचे ढीग पडलेले आहेत. " परशुराम कांहींही बोलला नाहीं. तो म्हणाला, " माझें अवतारकार्य पुरें झालेलें आहे. " आणि असें म्हणून तो हिमालयाकडे निघून गेला.

वसिष्ठांनीं नष्ट झालेली क्षत्रिय जात उभी केली; नष्ट झालेलें क्षत्रिय तेज निर्माण केलें. स्वतःचे परिश्रम, अनुभव आणि शहाणपणा यांनीं शासनसंस्था नियंत्रित केली. स्वतः मेहनतीनें लावलेल्या झाडालाच कापावें लागतें त्यावेळीं काय अवस्था होते !

तीच अवस्था वसिष्ठांना स्वतःच्या मतांचा त्याग करतांना अनुभवायला लागली होती. नंतर वसिष्ठांनीं सुनियंत्रित राज्य निर्माण केलें. त्यांचें त्याच्यावर इतकें प्रेम होतें कीं, वसिष्ठ आणि राजकारण एकच. राज्यतंत्र त्यांचें बालक होतें. त्यांचा संबंध वडिलांसारखा होता. म्हणूनच राज्यांत एकादा प्रश्न निर्माण झाला कीं वसिष्ठ सर्वांत अगोदर उभेच असत. प्रत्येक ठिकाणीं मंत्र्यांच्यापेक्षां त्यांचा सल्ला अगोदर घेतला जात असे.

मानव जातीचे आणि मानवी संस्कृतीचे शोधक म्हणून जग वसिष्ठांसमोर मस्तक नम्र करील. त्यांनीं मानवांचें संशोधन केलेलें आहे. 'अणु' जड आहे, त्याचे गुणधर्म बदलत नाहींत, त्यामुळें त्याचें संशोधन शक्य आहे. मानवांचे गुणधर्म क्षणोक्षणीं बदलत असतात. प्रत्येक क्षणीं ज्यांचे विकार आणि विचार बदलत असतात त्या मानवावर प्रयोग करणें अशक्य आहे. वसिष्ठांनीं हें केलें आहे. त्यांनीं मानवांवर प्रयोग केले म्हणून वसिष्ठ महान् होते. त्यांनीं हें नक्की केलें कीं क्षत्रिय जातीची आवश्यकता आहे आणि सुनियंत्रित राजसत्ता हवी. त्यामुळें तिचे आईबाप म्हणून वसिष्ठ उभे आहेत. आणि या सुनियंत्रित राजसत्तेची माता म्हणूनहि वसिष्ठच उभे आहेत.

वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यासारख्या ब्राह्मणांमुळें रामराज्य निर्माण झालें. त्यांना नाहींसें केलेंत तर रावणराज्य अनुभवावें लागेल. म्हणून ब्राह्मणाला पुष्ट न करतां ब्राह्मण्याला पुष्ट कराल तर जगाचा उद्धार होईल. ब्राह्मणांत तेज आणि ज्ञान कसें वाढेल तें पहा. सहस्रार्जुनापासून सुरवात करून रामापर्यंत पहा, राजसत्तेचा चढ-उतार दृष्टीला पडतो. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर संस्कृतीशीं वसिष्ठांचा केवढा संबंध आहे ! ते कांहीं कथा वाचणारे किंवा श्राद्ध, पूजा करणारे ब्राह्मण नव्हते. परंतु राजा बनवणारे राजगुरु होते, राजपुरोहित होते, तेजस्वी ब्राह्मण होते.

---

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**म हि ला व स्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# अनाथांचा नाथ एकनाथ

एखाद्याची थोर पुरुषांत किंवा साधु-संतांत उगाच नाहीं गणना होत. तसेच अलौकिक गुण त्याच्या अंगीं असतात. एकनाथांची कीर्ति त्यांच्याठायीं असलेल्या अलौकिक गुणांमुळें हां हां म्हणतां पसरली. त्यांच्याठायीं असे गुण कोणते होते, साधूंचीं लक्षणें कशीं ओळखावीं, व एकनाथाच्या आंगीं साधु या नांवास पात्रता कितपत होती, याचा विचार करूं.

हा पुरुष प्रतिष्ठानपुरींत अत्यंत लोकप्रिय असे, व ही लोकप्रियता होण्याचें मुख्य कारण त्याचें अप्रतिम वक्तृत्व. ह्या पुरुषानें कथापुराणाच्या रूपानें लोकस्थितीची उन्नति करण्याचें ब्रीदच बांधलें होतें, असें म्हटलें तरी चालेल. याच्या भाषासौष्ठवाचा व वाक्सौरस्याचा लाभ लोकसमूहास निरंतर व्हावा म्हणून पैठणकरांनीं एक भव्य मंदिर उठवून दिलें. या मंदिरांत निरनिराळे उत्साह समारंभ होऊन कृष्णजयंतीचा उत्साह फारच बहारीचा होई. एकनाथास कृष्णाची भक्ति विशेष असून कृष्णोत्साहामध्यें वाग्देवतेच्या मनोहर लीलेनें श्रोतृसमुदाय तल्लीन होऊन जाई. एकनाथाची कथा विशेष मनोहर होण्याचें दुसरें कारण असें होतें कीं, त्याच्या अंगीं तात्कालिक कविता करण्याचा मोठा गुण असे. कोणत्याही आख्यानावर जरी कीर्तन चाललें असलें, तथापि तात्कालिक कवित्वस्फूर्तीनें कीर्तनास रंग आल्याशिवाय राहात नसे. वाणी मधुर, भाषा सरळ असून सुबोध व उपमा, दृष्टांत देऊन विषयविवेचन, ह्यांच्या योगानें नाथाचें कीर्तन आबालवृद्धांस समजत असे. ह्या सत्पुरुषाचे वाक्पीयूषसेवनास पंक्तिप्रपंच कधींच होत नसे. वर्णहीन महारमांगांपासून तों वर्णश्रेष्ठ ब्रह्मवृंदापर्यंत, सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांस एकनाथाचें कीर्तन ऐकावयास सांपडे.

एकनाथास कीर्तनसमयीं जशी रंगदेवता निरंतर अनुकूल असे, त्याप्रमाणें एकनाथाचें पुराणश्रवण करण्यासहि श्रोत्यांच्या उड्या पडत. चक्रपाणीच्या तुटपुंज्या घरगुती शिक्षणापेक्षां अधिक शिक्षण जरी एकनाथास मिळालें नव्हतें, तथापि जनार्दनपंतांच्या व चंद्रभट्टाच्या साहचर्यानें, आणि लहानपणाच्या पुराणश्रवणानें, गीर्वाण भाषेशीं ह्या पुरुषाचा इतका परिचय झाला होता कीं, भागवतासारख्या ग्रंथाचें पुराण सांगून श्रोत्यांचें अंतःकरण आपणाकडे आकर्षूण घेण्याचा चमत्कारिक गुण याजमध्यें असे.

एकनाथाला केवळ संस्कृत भाषेचेंच आंग नसून प्राकृत भाषेचाहि तो पूर्ण

मर्मज्ञ होता. जो ग्रंथ आज सुमारें सहाशें वर्षे सांदीकोंदीला पडून राहिला आहे व सुधारणुकेच्या एकुणिसाव्या शतकांत सुद्धां शब्दकाठिण्यामुळें ज्याच्या पुनरुज्जीवनाचे विविध प्रयत्न आज चालू आहेत, त्याच ज्ञानेश्वरींतील रहस्यप्रतिभेनें विद्वज्जन दिपवून टाकून, सोळाव्या शतकांतच त्या ग्रंथाचा जयजयकार आमच्या एकनाथानें केला !!

कोणत्याही विषयाचें हुबेहुब स्वरूप श्रोत्यांच्या अंतःकरणांत उतरून देण्याची एकनाथाची हातोटी चांगली होती. भागवत व ज्ञानेश्वरी हे ग्रंथ एकनाथानें इतक्या सुलभ रीतीनें समजावून द्यावे कीं, ज्ञानेश्वरीच्या पाठपठणाशिवाय एक घरही त्यावेळेस पैठणांत राहिलें नव्हतें.

महाराष्ट्रभाषावधूची अनास्था जशी हल्लीं कित्येक ठिकाणीं दृष्टीस पडते, त्याप्रमाणें एकनाथाचे वेळींही होती. भूभ्रमणाचा खरा सिद्धांत प्रतिपादन करणें जितकें ग्यालीलिओला भयप्रद होतें, तितकें किंवा त्याहूनहि भयंकर, एकनाथाचे वेळीं महाराष्ट्र भाषेंत कवित्व किंवा वक्तृत्व करणें धोक्याचें होतें. जो तो गीर्वाणभाषा-वधूवरच मोर्चेलें उडवीत असून, कोणी महाराष्ट्र भाषेचा कैवार घेतल्यास, विद्वन्मुकुटमणि म्हणविणाऱ्या कित्येक शास्त्रपंडितांनीं तिलांजलि घेऊन उभें असावें. एकनाथालाहि अशाच प्रकारच्या आपमतलबी व परोत्कर्षासहिष्णु महापंडितांबरोबर टक्कर मारायची होती; परंतु चमत्कार हा कीं, श्रोतृसमुदायांत एकनाथांच्या नाशाविषयीं उद्युक्त असे कित्येक भलेबुरे गृहस्थ येत असून, नाथाचें अप्रतिम वक्तृत्व, त्याची रसाळ वाणी, त्याचा नीतिपर उपदेश, तात्कालिक कवित्व, आणि त्याचे आत्मानात्मविचार श्रवण केल्यावर त्यांपैकीं कित्येक चित्रासारखे तटस्थ होत! कित्येक कुमार्गगामी कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन ढळढळां रडत व कित्येकजण आपलें आचरण सुधारीत!

एकनाथाचे ठिकाणीं दुसरा अलौकिक गुण दातृत्व हा होता. ह्या पुण्यपुरुषानें आपलें वित्तसर्वस्व व बलसर्वस्व अन्नशांतीमध्यें खर्च केलें. निढळाच्या घामानें, पुराण सांगून जें द्रव्य त्यानें संपादन केलें, त्या द्रव्याचा व्यय, अंध, पंगु, निराश्रित व दुबळ्या लोकांस भोजनसुख देण्यांत व आर्तांचें दुःखविमोचन करण्यांतच होत असे. एकनाथाचें घर म्हणजे जराग्रस्त व निराधार लोकांचें माहेरघर होतें असें म्हटलें तरी चालेल. याचकानें जी जी इच्छा प्रदर्शित करावी, ती ती इच्छा तृप्त करण्यामध्यें हा अनाथांचा नाथ कधींच माघार घेत नसे.

ह्या असाधारण पुरुषाचे ठिकाणीं अद्वैत इतकें बाणून गेलें होतें कीं, त्याच्या शुद्ध व पवित्र अंतःकरणांत लहानमोठ्याची किंवा ज्ञातिभेदाची भावना अजीबात नाहींशी झाली होती!

अन्नशांतीचा हल्लींचा प्रचार म्हटला म्हणजे, सजातीय कितीहि नीतिहीन व ज्ञानहीन असला तरी त्याचा आदरसत्कार व्हावा, परंतु तोच भिन्नजातीय असून नीतिसंपन्न व ज्ञानी कां असेना, त्याची पायमल्ली व्हावी; वर्णश्रेष्ठ ब्रह्मवृंद कर्महीन व ज्ञानहीन कां असेना, त्यास घृतकुल्ल्या मधुकुल्ल्या भरल्या पोटावर आग्रहानें चाराव्या,

परंतु त्याच वेळीं एखादा क्षुधेनें व तृषेनें पीडित झालेला असा दीन हीन अंत्यज गोळाभर अन्नासाठीं जर दाराशीं केविलवाण्या स्वराने ओरडत आहे, तर, त्याजवर गालिप्रदानाचा वर्षाव करावा, किंवा अर्धचंद्रप्रयोग व्हावा, अथवा दातृत्वप्रवाहाचा ओघ फारच वाहिला, तर उष्टींमाष्टीं चार शितें त्याचे तोंडावर टाकावीं. हा जो अन्नशांतीचा प्रचार आहे, त्या प्रचाराहून एकनाथाच्या अन्नदानाचा प्रकार फार भिन्न असे. एकनाथास ब्राह्मणसमुदाय जरी सर्वदा वंद्य असे व ब्रह्मवृंदाची सेवाचाकरी जरी त्यानें उल्हास वृत्तीनें निरंतर करावी, तथापि महारमांगासारख्या वर्णहीन दुबळ्या लोकांची त्यानें कधींच अवहेलना केली नाहीं. अशा अनाथ लोकांस उपदेशामृत पाजून ज्ञानी व नीतिसंपन्न करावें व त्यांस दूर न लोटतां त्यानें त्याची दुःखापासून सुटका करावी. फार काय, ह्या ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं भिन्नभाव इतका अस्तंगत झाला होता कीं, पितृतिथीला क्षण दिलेल्या द्विजवर्यांस एकीकडे ठेवून, क्षुधेनें पीडित झालेल्या अंत्यजांस एकेवेळीं नाथानें श्राद्धीय अन्न वाढून, पंचपक्वान्नांच्या रसमाधुरीनें तृप्त करून सोडिलें !!

एकनाथाचे ठिकाणीं तिसरा मोठा गुण सहनशीलता हा होता. शांतवृत्ति व सहनशीलता हे दोन गुण ह्या अद्वितीय पुरुषाचे ठिकाणीं स्वाभाविक असून पुढें जसजसा ह्या गुणांचा विकास होऊं लागला, तसतसा लोकसमूह ह्याच्या गुणाधिक्यानें चकित होऊन गेला.

एकनाथ हा प्राच्यदेशीय सॉक्रेटीस होता म्हटलें तरी साजेल. एकनाथाची महासाध्वी स्त्री गिरजाबाई ही सत्वस्थ व सुशील असल्यामुळें, जी उणीव पडणार होती, ती, कित्येक पैठणकर खप्पींनीं काढून टाकलीच होती ! तुकारामाची जगविख्यात जिजाबाई, व सॉक्रेटिसाची कर्दनकाळ झँटिपी, ह्या जशा आपापल्या नवऱ्याचें सत्व पहाण्यास अवतरल्या होत्या, त्याप्रमाणेंच एकनाथाच्या सहनशीलतेला पुरा कस लावण्याकरितां प्रतिष्ठानपुरींतही कित्येक हरिभक्त कंबर बांधून तयार होतेच !

एकनाथच्या आंगच्या वक्तृत्व, दातृत्व, आदिकरून गुणांनीं जरी तो लोकप्रिय होता, तथापि त्याचा अभ्युदय, त्याची उन्नति, व त्याचें पुराणपटुत्व सहन न होऊन त्याचा छल करण्याविषयीं बहुत लोक प्रवृत्त होते. संस्कृत ग्रंथांचें रहस्य प्राकृत भाषेंत सांगितल्यामुळें आपल्या पोटावर पाय येतो, असें कित्येक पुराणिकांस वाटून त्यांनीं एकनाथाचा हेवा करावा व ह्याच्या वेदांती कथा—कीर्तनाच्या योगानें लोक प्रवृत्तिमार्ग सोडून निवृत्तिमार्गानें चालू लागले, हें पाहून एकनाथाचा कीर्तिचंद्र ग्रासून टाकण्याचा सतत उद्योग त्यांनीं चालवावा.

एकनाथाचा जरी इतका छळ होत होता, तथापि त्याच्या सहनशीलतेचा मनोरा बालाग्रही. डगला नाहीं. एकनाथाच्या हितशत्रूंनीं निंदाव्यंजक शब्दांचा भडिमार करावा, त्याच्या साधुत्वाच्या कीर्तीस कालिमा लागावा एतदर्थ मिथ्या व

भ्रांतिमूलक लोकवार्ता पसराव्या, त्याला बहिष्कृत करून छबीना काढण्याची तयारी करावी. तथापि ह्या क्षमाशील व विवेकी पुरुषास यत्किंचित् सुद्धां क्रोध येत नसे; त्यानेंच उलट निंदा व छळ करणाऱ्या लोकांची पायधरणी करावी, त्यांचें शांतवन करावें, ते क्रोधवश कसे होतात ते त्यांच्या प्रचितीस आणून देण्याचा यत्न करावा, व आपल्या खऱ्या पक्षाचें मोठ्या शांततेनें प्रतिपादन करावें!!

केवळ प्रतिष्ठाननगरींतील लोकच ह्या जितेंद्रियाचें सत्व पहात नसून भरतखंडाच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हा साधुवर्य सहनशीलतेच्या व दुसऱ्या कित्येक अलौकिक गुणांच्या संबंधानें गाजला! काशीकर पंडितांनीं ह्या बिचाऱ्यावर फारच गहजब गुदरविला. त्यांनीं आपल्या कुत्सित बुद्धीची परमावधि करून एकनाथ निरपराधी असूनही, त्याजवर आग पाखडली. एके समयीं तर महाराष्ट्र भाषेंत कविता केल्याचा दोषारोप ठेवून, ह्या काशीकर पंडितांनीं अर्धचंद्रप्रयोग करून बिचाऱ्या पैठणकर कवीस थेट काशीपर्यंत खेचित नेलें; परंतु शेवटीं "सत्यमेव जयते" हा न्याय होऊन या साधुश्रेष्ठाचीच सरशी झाली!!

ह्या थोर पुरुषाच्या सहिष्णुतेची एक चमत्कारिक आख्यायिका आहे. ती येथें लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं—

एके दिवशीं हा सत्वस्थ ब्राह्मण गंगेवरून स्नान करून येत असतां, मार्गांत एक उन्मत्त यवन याचे अंगावर थुंकला. तो प्रकार पाहून तोंडांतून चकार शब्द न काढितां एकनाथ पुन्हा गंगेवर स्नानास गेला. स्नान करून परत आला तों, पूर्वीप्रमाणेंच त्या यवनानें थुंकण्याचा विधि केला. तरीहि कांहींएक वाईट न वाटतां "मनोनिग्रह करण्याची ही किती सर्वोत्कृष्ट संधि आहे" असें मनांत म्हणत पुन्हा स्वारी गंगेवर गेली! यवनानेंहि विचार केला कीं, "मोंगलाईंत ब्राह्मणधर्माचा टेंभा पाजळणारा हा कोण इतका सोंवळा भटोरा आहे, त्याची पुरीच खात्री करावी." असें म्हणून तोही चड्डीकांचा भिडवून आपलें थुंकण्याचें कर्तव्य बजावण्यास सिद्ध झाला.


नंतर त्या अविंधानें थुंकावें व नाथानें पुन्हां स्नान करून यावें, असा प्रकार अस्तमानपर्यंत चालला होता. हा सहनशीलतेचा व दुराग्रहाचा झगडा पहाण्यास ही गर्दी जमली! जयश्रीची माळ कोणाच्या गळ्यांत पडते ती पहाण्याविषयीं प्रेक्षकजन उत्कंठित होऊन गेला! सरतेशेवटीं त्या यवनाचें तोंड थुंकतां थुंकतां दुखून त्याचा तोच खजील होऊन गेला; व हा कोणी क्षमाशील असाधारण मनुष्य असावा असें त्यास वाटून कृतकर्माचा त्याला पश्चात्ताप झाला व एकनाथाची त्यानें क्षमा मागितली!

पूर्वनिर्दिष्ट गुणांशिवाय निरभिमान, भूतदया, निरिच्छता, आत्मनिग्रह, स्थैर्य, समचित्तत्व, विषयवैराग्य, परोपकार आदिकरून जे गुण खऱ्या साधूच्या ठिकाणीं अवश्य पाहिजेत, व ज्या गुणांचीं लक्षणें समर्थांसारख्या पुरुषश्रेष्ठांनीं, व तुकोबासारख्या सत्पुरुषांनीं, बांधिलेलीं आहेत, ते सर्व गुण मूर्तिमंत एकनाथाच्या ठिकाणीं होते "परोपकाराय सतां विभूतयः" हें जें महावाक्य, व त्याच अर्थाची, "जगाच्या

कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टवीति उपकारें ॥ ” ही जी शूद्रकवीची उक्ति, त्याप्रमाणें अक्षरशः एकनाथाचें वर्तन असे. ह्या पुरुषानें गृहस्थाश्रम स्वीकारल्यापासून गोदातीर्थी देह विसर्जन होईपर्यंत आपला देह परोपकार करण्यांत झिजविला! अन्नान्नगत झालेल्या लोकांस यानें अन्नदानानें तृप्त केलें. नीतिभ्रष्ट व अज्ञानांधकारांत चांचपडत असलेल्या लोकांस उपदेशामृत पाजून व नीतिपर ग्रंथरूप दीपिका उज्वलित करून, नीतिसंपन्न व ज्ञानी करून सोडिलें! भजन, पूजन, कथा, पुराण व सत्कृत्य ह्यांशिवाय दुसऱ्या गोष्टीचा व्यासंगच या पुरुषास नसे! ह्याचे ठिकाणीं भूतदया इतकी ओतप्रोत असे कीं, आर्तांचें दुःख निवारण्याचा समय आला म्हणजे, ह्या दयाशील पुरुषानें काळ पाहूं नये, वेळ पाहूं नये, स्थळ नाहीं, जात नाहीं, भाऊ नाहीं, बंधु नाहीं, कांहींएक न जुमानतां दुःख निवारण करावें!! ह्या अद्वितीय पुरुषानें गोदातीरीं तापलेल्या वाळूवरील पोरकीं पोरें व चुकलेलीं अतिनीचांचीं व अत्यंजांचींसुद्धां मुलें कडेवर घ्यावींत, त्यांस आपल्या अंगवस्त्रानें स्वच्छ करून खाऊ देऊन ती उगीं करावीं व त्यांस महारवाड्यांत नेऊन त्यांच्या मातापितरांचे स्वाधीन करावें!!

आपल्या अद्वितीय गुणांच्या योगानें जगास चटका लावणाऱ्या ह्या दयार्द्र पुरुषानें स्वकष्टानें संपादन केलेलें ज्ञान, विद्या व धन हीं परोपकारी खर्च केलीं! कुमार्गगामी पुरुष दृष्टीस पडला म्हणजे त्याचें घरीं त्यानें अनेक वेळां जावें. तो नको नको म्हणत असतां व धिक्कार करीत असतांहि, त्याचे कानीं कपाळीं ओरडून एकनाथानें त्यास चार सोईच्या गोष्टी सांगाव्या. दुर्व्यसनाचे दारुण परिणाम त्याच्या लक्षांत आणून द्यावे, व त्यास सुमार्गास लावावें. दुष्टांस सुष्ट करण्याची युक्ति अशी असे कीं, चोरी करावयास आलेल्या तस्करास मारहाण न करितां उलट त्याचें चुकून राहिलेलें द्रव्य त्यास देऊन, पश्चात्तापानेंच त्यास एकनाथ ताळ्यावर आणी.

एकनाथ हा साधुवृंदाचें शिरोभूषण होण्यास आणखी एक सबळ कारण हें आहे कीं, ह्या अलौकिक पुरुषाच्या बोलण्यांत व करण्यांत काडीमात्र तफावत नसे.



# ज्ञानेश्वरकालीन संतवाङ्मय

**************·**********·*****

श्रीज्ञानदेवांनीं तीन मुख्य ग्रंथ लिहिले; ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व अभंग गाथा. यांपैकीं अमृतानुभव एकंदरींत पाहतां केवळ तत्त्वज्ञानात्मक आहे. अभंगगाथा आध्यात्मिक अनुभवनिष्ठ आहे, तर ज्ञानेश्वरींत या दोहोंचा समावेश आहे. आम्ही श्रीज्ञानेश्वराच्या तत्त्वज्ञानास बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद म्हटलें आहे. कारण त्यास भगवद्गीतेंतील तत्त्वज्ञानाचा पूर्ण आधार आहे. त्या अमर काव्यावर जीं अनेक भाष्यें लिहिण्यांत आलीं, त्या सर्वांमध्यें ज्ञानेश्वरी हें भाष्य अत्यंत श्रेष्ठ ठरतें हें उघड आहे. आम्ही या थोर ग्रंथांतील जे अनेक उतारे दिले आहेत, त्यांवरून ही गोष्ट सहज सिद्ध होते. सर्व ज्ञानेश्वरीचा संपूर्णतया इंग्रजींत अनुवाद प्रसिद्ध करून तो जगांतील सर्व विद्वानांना उपलब्ध केव्हां होईल याची सर्व जग वाट पहात राहील. आम्ही दिलेले वेंचे प्रातिनिधिक स्वरूपाचे असून श्रीज्ञानदेवांची प्रतिमा किती श्रेष्ठ होती याची वाचकांस सहज कल्पना येईल. नीतिशास्त्राची चर्चा अत्यंत श्रेष्ठ आहे. त्यांत दिलेलें सद्गुणांचें सूक्ष्म व विस्तृत पृथक्करणात्मक विवरण अत्यंत खोल व मूलग्राही आहे. श्रीज्ञानदेवांच्या तत्वज्ञानाचा पाया ज्ञानेश्वरींत जो दिसून येतो, तो एकंदरींत अद्वैत स्वरूपाचा आहे. अर्थात् केव्हां केव्हां वेदांतांतील इतर मतांचा निर्देश त्यांत सांपडतो. अद्वैत व भक्ति यांची सांगड महाराष्ट्रीय संत कशी घालतात याचें डॉ. रामकृष्ण भांडारकरांना मोठे कोडें होतें. सर्व अनुभूतिशास्त्रांमध्यें अशा तऱ्हेचा भक्तीचा व अद्वैताचा समन्वय केलेला असतोच. तो महाराष्ट्रीय संतांच्या साक्षात्कार वादांत विशेष उत्कटत्वानें दिसून येतो, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अमृतानुभवाची तात्त्विक बैठक निराळ्या स्वरूपाची आहे. या ग्रंथांत श्रीज्ञानेश्वरांच्या विचारांवर "शिवसूत्रां"चा पगडा दिसतो. कारण पिंड, पद, शिव, शक्ति इत्यादि शब्दांचा उल्लेख श्रीज्ञानेश्वरांनीं या ग्रंथांत केला आहे. गोरखनाथ व इतर नाथांच्या ग्रंथांचा शोध व संशोधन झालें म्हणजे नाथसंप्रदायाचा श्रीज्ञानेश्वरांच्या विचारावर व लिखाणावर काय परिणाम झाला होता, हें पाहणें फार मनोरंजक होईल. अमृ. ३·१६ वरून शिवसूत्रांतील तत्त्वज्ञानाचा परिणाम श्रीज्ञानेश्वरांवर निश्चितपणें झाला होता, ही गोष्ट उघड आहे. "आणि ज्ञानबंधू ऐसे। शिवसूत्राचेनि मिषें। म्हणितलें असे। सदाशिवें." 'सामान्यपणें सर्वांस विदित असलेल्या मायावादा-विरुद्ध श्रीज्ञानदेवानीं जी टीका केली आहे, ती श्रीरामानुजांनीं आपल्या श्रीभाष्यांत श्रीशंकराचार्यांच्या मायावादाविरुद्ध जी टीका केली आहे तिच्याशीं तंतोतंत जुळते, ही गोष्ट फार आश्चर्यकारक आहे. ही गोष्ट पंडित पांडुरंगशर्मांनींहि अगदीं स्पष्टपणें दाखविली आहे. नीतिशास्त्रदृष्ट्या व अनुभूतिशास्त्रदृष्ट्या मायावादास महत्त्व आहे,

असें श्रीज्ञानेश्वरांचें मत होतें. तात्त्विकदृष्ट्या ते अमृतानुभवांत आपला स्वतंत्र स्फूर्तिवाद प्रतिपादतात. रत्नापासून प्रकाश बाहेर पडतो त्याप्रमाणें जगत् ईश्वरापासून निर्माण होतें; व प्रकाश जितक्या प्रमाणांत खरा तितक्या प्रमाणांतच जगत् खरें आहे. यानें जगत् पूर्णपणें असत् आहे असें ठरत नाहीं, असें ज्ञानदेवांचें मत आहे. नीतिशास्त्राच्या व अनुभूतिशास्त्राच्या दृष्टीनें ते मुक्तकंठानें सांगतात कीं,

आतां महदादि हे माझी माया । उतरोनिया धनंजया ।
मी होईजे ये आया । हें कैसेनियें ॥
येथ एक नवलावो । जो जो कीजे तरणोपावो ।
तो तो अपावो । होय तें ऐक ॥
पाडस वागुर करांडी । किंवा मुंगी मेरू वोलांडी ।
तरी मायेची पैलथडी । देखती जीव ॥
येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले ।
तयां ऐलीच थडीं सरलें । मायाजळ ॥ ज्ञा. ७—६८—९७.

या नश्वर जगांतलें आपलें राहणें असत्य व भ्रममूलक आहे, हें अचूकपणें श्रीज्ञानदेव दाखवितात; परमार्थच तेवढा खरा आहे या गोष्टीकडे ते लोकांचे मन वेधतात. हें पारमार्थिक सत्य भक्तीनें प्राप्त होते. आपल्या अनुभवास येणारें नानात्व व ऐक्य दोन्हीं खरीं आहेत, असें ते प्रतिपादतात. अद्वैत व अनेक तत्त्ववाद या दोहोंचा ते समन्वय करितात. "श्रीशंकराचार्यांच्या पूर्ण अद्वैतांत, किंवा शुद्ध द्वैतांत खरी शांति किंवा समाधान मिळत नाहीं; या दोहोंच्या पलीकडे व या दोहोंना समाविष्ट करणाऱ्या आध्यात्मिक अनुभवांतच ती मिळते, असें मॅक्निकल म्हणतात, तें खरें आहे. तेथें आध्यात्मिक अनुभवाचें स्वरूप काय, या तात्त्विक चर्चेंत आम्ही शिरूं इच्छीत नाहीं. परंतु, भक्तींत अनुभूत होणारें द्वैत व अनुभूतींत प्रतीत होणारें अद्वैत हीं परस्पर-विरोधी नाहींत, असें म्हणणें योग्य होईल. याप्रमाणें श्रीनिवृत्ति—ज्ञानदेव—सोपानदेवादि संतांनीं द्वैत—भक्तीनें सुरुवात केली व शेवटीं अद्वैत पारमार्थिक आनंद अनुभविला. म्हणून महाराष्ट्रांतील भक्ति—संप्रदायाचे श्रीज्ञानदेव हे आद्य प्रवर्तक होते, असें जें फार्कूहर म्हणतो तें बरोबर आहे. श्रीज्ञानदेवांनीं हा अनुभूतिशास्त्राचा बुद्धिनिष्ठ मजबूत पाया घातल्यावर, त्यावर भक्तिमंदिर उभारण्याचें इतर संतांचे काम फारसें कठीण नव्हतें. श्रीज्ञानदेवांसारखा शिष्य निर्माण करणारे श्रीनिवृत्तिनाथ परमश्रेष्ठ संत असले पाहिजेत. श्रीज्ञानदेवांनीं सोपानाची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. या तिघां भावंडांची धाकटी बहीण मुक्ताबाई, सर्व पारमार्थिक स्त्री—संतांमध्यें श्रेष्ठ होती. या परंपरेच्या शेवटीं येणारे चांगदेव म्हणजे 'प्रत्यक्ष देवदर्शनापुढें केवळ योगप्रधान जीवन फिकें व अपुरें ठरतें' याचें अत्यंत उदात्त व जिवंत उदाहरण होय.

---

## जीवन रहस्य

बाल–बालिका हसुनी रुसुनी खेळ मांडिती जनीं।
तसेंच जीवन मानवतेचें स्वप्न रंगवी मनीं !!
कोमल आणिक प्रेमळ वृत्ति गुंफण करिती क्षणीं।
त्यांत मिसळते क्रुद्ध नराची तामसवृत्ती झणीं !!
जीवन आहे काव्यफुलोरा सरिता जीवन असे।
जीवन आहे सर्व चराचर त्यांत गुंगुनी हसे !!
कवी बोलती काव्यीं जीवन जीवनांत काव्यही।
दुजे बोलती काव्य असेरे मानवतेचे गृहीं !!
कीर्तिकाव्य हे अपकीर्तिही काव्य असे या जनीं।
जे वर्णावे तेंच काव्यहो प्रतिभेच्या चित्रणीं !!
मंदिर मूर्ति भक्त तसे हे गीत–काव्य जाहलें।
कविवर्यांनी स्वतंत्रतेचें गान जयीं गाइलें !!
विश्वकाव्य हे अमर जगाला देइ मोद चिंतनीं।
कथाकल्पना नाट्यकृतिही आनंदाच्या खनी !!
रहस्यमय हें जीवन, म्हणुनी हृदय व्यथा पाहुनी।
कुणी म्हणावें जीवन अमुचें रुक्ष भासलें क्षणीं ?

—ना. मा. तलारवार

## चाल मज घेउनि विश्वासांत

हवा मज माझा साईनाथ
नको मज अन्य कांहीं जीवनांत ॥ १ ॥

मी असतां बालपणांत
चाले माझ्या पाठोपाठ।
मी पडतां धरुनि हात
मजला दिधली प्रेमळ साथ ॥ २ ॥

मी येतां तारुण्यांत
वाट मज दिसे न अंधारांत।
बोल मग हळुच येति कानांत
"चाल मज घेऊनि विश्वासांत" ॥ ३ ॥

ठेउनि बोधामृत ध्यानांत
वाट मी चाले संसारांत।
उणें मज कांहीं न आयुष्यांत
भेटही दिधली प्रत्यक्षांत ॥ ४ ॥

—शाम जुवळे




## ऑगष्ट १९६६

या महिन्यांत अधिक महिना आला त्यामुळें दर्शन घेऊन जाणाऱ्या भक्तांची गर्दी बरीच होती.

कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें.

**कीर्तन**

श्री. सौ. सुबदा दिगंबर बोंदे, मांगलवाडी, गिरगांव, मुंबई.

संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांचीं कीर्तनें नेहमींप्रमाणें झालीं.

श्री. ह. भ. प. हिंमतबाबा मोरे, तळेगांव ( चाळीसगांव ).

**भजन**

लांडे भजनी मंडळ ( श्री. कोंडिराम भिकाजी वैजापूरकर ) मु. नाहीं. ता. वैजापूर ( मराठवाडा )

संस्थान नोकरांचे भजनी मंडळाचा कार्यक्रम या महिन्यांत झाला. श्री. मे. माननीय रिसीव्हरसाहेब यांनीं भजनाचे कार्यक्रमांत आवडीनें हजर राहून भजनें गाईलीं.

**मोठ्यांच्या भेटी**

( १ ) डॉ. विन्सट्न किंग व श्रीमती किंग ( तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक ) वन्डरबील्ड युनिव्हर्सिटी ( अमेरिका )

( २ ) श्री. एस. वाय. कवळी. ॲड्व्होकेट, मुंबई हायकोर्ट.

शिर्डी येथील हवापाणी ( पाऊस बरा झाला असून पिकास उपयुक्त ) रोगराई कांहीं नाहीं. हवा चांगली आहे.

---



# Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | **साईबाबा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | **साईबावांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपीत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१५) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | –५० |
| (१६) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१७) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१८) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (१९) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

(1) Baba sitting on Stone 9½" × 13½" medium **00–37**
(2) ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium **00–50**

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०५७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : बी. जी. पोतनीस. 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,